Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. २०/ २०१३** **दिनांक १३.१२.२०१३**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सांय. ०६.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दिनांक १३.१२.२०१३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-४१४३-२०१३, दिनांक १३ डिसेंबर,२०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दि.१३.१२.२०१३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता संस्थानचे जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.डॉ.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १४.११.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.९३३** **दिनांक १४.११.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **दिनांक १८.११.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.९३४** **दिनांक १८.११.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे सप्टेंबर-२०१३**

माहे, सप्टेंबर- २०१३ मधील जमा रु.३३,८६,६२,७२१/- आणि खर्च रु.१४,१४,६२,३४१/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे सप्टेंबर- २०१३ मधील रुपये २,३४,३१४/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.३०.०९.२०१३ रु.९,९६,२८,८०,०३४/- चा तक्ता.

**निर्णय क्र.९३५ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**(ब) माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर- २०१३ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने, चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या अनुक्रमे माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर- २०१३ मधील अनुक्रमे जमा रु.१३,१३,२४,८११.२५ व रु.१२,५५,६९,१२६/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.९३५ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**(क) माहे नोव्हेंबर- २०१३ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा माहे नोव्हेंबर- २०१३ मधील रु.३,६८,६००/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.९३५ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर- २०१३ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर- २०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये १,८३,९२४/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.९३५ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर- २०१३ या महिन्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे ऑक्टोबर- २०१३ मधील रु.४२,२६,०००/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.९३५ (E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. माहे ऑक्टोबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत वाटप केलेल्या लाडू प्रसादाची नोंद घेणे.**

ऑक्टोबर-२०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना १३,५२,२५० पाकिटे व त्यासाठी रु.१,७२,९०,७१०/- आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या

**निर्णय क्र.९३५ (F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**०५. माहे ऑक्टोबर- २०१३ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

माहे ऑक्टोबर- २०१३ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे ५६,८८४ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.९३५ (G) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०४ श्री साई प्रसादालय इमारतीमधील व्ही.आय.पी.डायनिंग हॉलवरील पॉली कार्बोनेट डोमचे नुतनीकरणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे श्री साईप्रसादालय इमारतीचे पहील्या माळयावरती दक्षिणेकडील हॉलमध्ये व्हि.आय.पी. भक्तांकरीता प्रसाद भोजन व्यवस्था करणेत येते. सदर हॉलकरीता मूळचे प्रसादालय बांधकामामध्ये डोमचे आकर्षक छत तयार करण्यात आलेले आहे. सदर डोमचे मध्यवर्ती भागास नैसर्गिकरित्या प्रकाश येणेकरीता पॉलीकार्बोनेट शिटचे डोम हे २००७ साली तयार करणेत आले होते. वातावरणाच्या परिणामामुळे सदरचे पॉलीकार्बोनेट शिट खराब झाले असून त्यातून व्हि.आय.पी. डायनिंग हॉलमध्ये काही ठिकाणी पावसाचे पाण्याची गळती होत आहे. याबाबत प्रसादालय विभागाने इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव :-** श्री साई प्रसादालयाचे व्हि.आय.पी. कक्षातील डोमच्या पॉलीकार्बोनेट शिट बदलून ऐवजी नविन पॉलीकार्बोनेट शिट बसवावे लागणार आहेत. याकामी एका डोमची दुरुस्ती करणेस खालील प्रमाणे खर्च येईल.

| Sr.No. | Description | Amount |
|---|---|---|
| 01. | Providing and Fixing in Position 10 mm thick Multiwall Polycarbonate sheet in skylight fixed over existing framwork with the special aluminium profile and neoprene gaskets including sealing the joints with silicon sealants making it fully waterproofing etc. complete. | 1,35,000/- |
| 02. | Providing & fixing of metal Sheets in 0.50mm TCT permanently colour coated on Galvalume Sheets for roofing including fastening with screws & bolts. | 25,000/- |
| | Add VAT 8% & Service tax 4.08% | 19,328/- |
| | Transport Charges & other miscillinious charges | 10,000/- |
| | Total Amount : | 1,89,328/- |
| | Say Rs. : | 1,90,000/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साईप्रसादालयातील व्हि.आय.पी. डायनिंग हॉलचे एकूण चार छताचे पॉलीकार्बोनेट डोम दुरुस्त करणेसाठी प्रत्येकी रु.१,९०,०००/- प्रमाणे अंदाजे रु.७,६०,०००/- मात्र खर्च येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** तरी श्री साईप्रसादालयातील व्हि.आय.पी. डायनिंग हॉलचे चारही पॉलीकार्बोनेट डोमचे दुरुस्ती करणेसाठी येणारे अंदाजे रु.७,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील व्हि.आय.पी. डायनिंग हॉलचे चारही पॉलीकार्बोनेट डोमचे दुरुस्ती करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५** **शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना अर्थसहाय्य करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी त्यांचे दिनांक २० सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्राने खालील बाब नमूद केलेली आहे.".. मी आपणांस कळवू इच्छितो की, " या विमानतळाची धावपट्टी, टॅक्सी वे, ॲप्रन, ड्रेनेज, कम्पांऊंड वॉल आणि टर्मिनल बिल्डींग यांचे काम डिसेंबर, २०१३ पर्यत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने शिर्डी विमानतळाकरीता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस रुपये ५० कोटी अनुदान मंजूर केले होते. तथापि, आजपावेतो रु. ४५ कोटी अनुदान स्वरुपात उपलब्ध करण्यात आले आहेत. वर नमूद केलेली कामे वेळेत पूर्ण होवून शिर्डी विमानतळ पूर्णत्वास नेणेसाठी उर्वरीत रुपये ५ कोटीचे अनुदान त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावी ही विनंती.

(ब) पुर्वपिठीकाः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ कलम २१ मध्ये (क) पोटकलम (१) नंतर

" (१ क) पोट कलम १ च्या तरतुदींना अधिन राहून विश्वस्तव्यवस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वहानतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

१.मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक १३० खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्यात विमानतळ विकसीत करणेसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विमानतळ प्राधीकरण कं.लि., (MADC) नेमणूक केलेली आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, MADC ज्या ठिकाणी विमानतळाची जागा निश्‍चित करेल त्या ठिकाणी विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत विहीत पध्दतीने शासनाची मान्यता घेऊन योग्य ती आर्थिक मदत करण्यात येईल असे कळविण्यात यावे, असे ठरले."

०२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जानेवारी, २००९ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक २३ खालील प्रमाणे झाला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी रक्कम रुपये ५० कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय अटी असतील तसेच कोणत्या पध्दतीने निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले."

संस्थानचे वरील दोन्ही निर्णय शासनास पत्र क्रमांक एसएसएसटी / बांधकाम / २००९ दिनांक २९ ऑक्टोबर, २००९ ने अवगत करुन देण्यात आलेले आहे.

त्यानंतर शासन विधी व न्याय विभाग, आदेश क्रमांक सासावि २०११ (प्र. क्र. ४४) का. सोळा दिनांक २४ जून, २०११ रोजीचे पत्राने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ (२००४ चा महा १४) याच्या कलम २१ च्या पोट कलम (१ ) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याव्दारे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांना पुढील अटी व शर्तीच्या अधिनतेने रुपये ५० कोटी (रुपये पन्नास कोटी) इतक्या मर्यादेपर्यन्त सहाय्यक अनुदान देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेस प्राधिकार व परवानगी देत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त शासन आदेशानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना खालील प्रमाणे सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे.

| अ. नं. | तपशिल |
|---|---|
| १. | टप्पा क्रमांक ०१ : रुपये १५ कोटी (दि.५/०७/२०११ रोजी) |
| २. | टप्पा क्रमांक ०२ : रुपये २० कोटी (दि.२५/७/२०११ रोजी) |
| ३. | टप्पा क्रमांक ०३ : रुपये १० कोटी (दि.९/९/२०११ रोजी) |

**एकुण रुपये : ४५ कोटी**

आता शासनाच्या नियमाप्रमाणे ५० कोटी पैकी ४५ कोटी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्यादित, मुंबई यांना देणेत आले आहे व रक्कम रुपये ५ कोटी द्यावयाचे आहेत.

(क) शासनाने सदर सहाय्यक अनुदान मंजूर करतांना ज्या अटी व शर्ती घातल्या होत्या त्याची पुर्णपणे पुर्तता झालेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. करीता उर्वरीत सहाय्यक अनुदान रक्कम रुपये ५ कोटी देणेबाबत उचित राहणार आहे.

| अ. नं. | अट | पुर्तता झाली किंवा कसे |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित मंजूर रकमेचा विनियोग केवळ शिर्डी येथील विमानतळ विकसित करण्यासाठी करील. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रात त्यांनी कलम २ मध्ये नमुद केले आहे की, सदरहू निधिचा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापर केला जाणार नाही व शिर्डी साईबाबा एअरपोर्ट न्यासाचा खर्चाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवणेत येईल.<br>मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांचे दिनांक २० सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रासोबत सन २०११-२०१२ सालाचे शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्टचे ऑडीट सारडा ॲण्ड पारीक कंपनीनें केलेले आहे. त्यात संस्थानचे ४५ कोटी आलेले दाखविले व खर्चही दाखविलेला आहे. अशा रीतीने अटीची पुर्तता झालेली आहे. |
| ०२ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित अशा अनुदानाचा स्वतंत्र हिशोब ठेवील आणि त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करणार नाही. | |
| ०३ | उक्त कंपनी, सहायक अनुदानाचा विनियोग केल्यापासून तीन महिन्याच्या आत, राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला, विनियोग प्रमाणपत्र तीन प्रतीत सादर करील. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांनी सहाय्यक अनुदान विनियोग पत्र दिनांक ११ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रासोबत एक प्रतीत पाठविलेले आहे.<br>मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांनी दिनांक २० सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्राने सन २०११-२०१२ चा ऑडीट रिपोर्ट पाठविलेला आहे. |
| ०४ | शासनमान्य लेखापरिक्षकांचा, अनुदानाच्या विनियोगाबाबतचा लेखापरिक्षण अहवाल राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला सादर करण्यात येईल. | |
| ०५ | विमानतळाचा विकास केल्यानंतर, उक्त कंपनी, किमान १,००० चौरस फुट इतकी जागा माहिती केंद्र, प्रसिध्दी केंद्र, इत्यादी उभारण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेला मोफत देईल. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांनी त्यांचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रामध्ये अ. नं. ५ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.<br>५. विमानतळाचा विकास झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संस्थेने मागणी केलेली किमान १००० चौ. मी. इतकी जागा माहितीकेंद्र उभारण्यासाठी देण्याबाबत योग्यवेळी ठराव करण्यात येईल. |
| ०६ | राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर अटी व शर्ती, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांना व विश्वस्तव्यवस्थेला बंधनकारक असतील. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रातील ६ मध्ये नमूद केले आहे.<br>" शासनाने वेळोवेळी घातलेल्या अटी व शर्ती म.वि.वि. कंपनीस बंधनकारक असतील. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(ड) मा. व्यवस्थापन समितीने पूर्वी केलेल्या निर्णयानुसार व शासनाच्या आदेशाप्रमाणे रक्कम रुपये ५० कोटी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना देणेबाबत मंजूरी दिलेली त्यापैकी ४५ कोटी दिलेले आहेत. आता फक्त ५ कोटी द्यावयाचे आहे तसेच सदर ५ कोटी देणेपूर्वी श्री. राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर, शिर्डी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेली पी आ एल १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ दिनांक १६/१०/२०१२ रोजीच्या निकालात कलम ६ (c) खालिलप्रमाणे आहे.

" 6) We direct that, without prior permission of this Court, the committee,

........................................................................................................

Shall not take any major financial decision of whatsoever nature;

या कलमान्वये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना द्यावयाची उर्वरीत रक्कम रुपये ५ कोटी देणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन मंजूरी मिळविणे उचित राहील.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१. शासन विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक सांसवि-२०११ (प्र. क्र. ४४) का. सोळा दिनांक २४ जुन, २०११ रोजीच्या आदेशान्वये संस्थानने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना काही अटी व शर्ती रक्कम रुपये ५० कोटी सहाय्यक अनुदान देण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी आजपावेतो ४५ कोटी रुपये देणेत आलेले आहे. उर्वरीत ५ कोटी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना देणे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री. राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर, शिर्डी यांनी दाखल केलेले आय. पी. एल. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ बाबत दिनांक १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या निकालाप्रमाणे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे पी. आय. एल. १८/२०११ मध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शासनाने दिनांक २४ जुन, २०११ रोजीच्या आदेशाप्रमाणे ५० कोटी रुपये सहायक अनुदान देणेबाबत मंजूरी दिलेली आहे त्यापैकी आजपावेतो ४५ कोटी दिलेले आहे. उर्वरीत रक्कम रुपये ५ कोटी देणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे पी. आय. एल. १८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

३. याबाबत वकील फी तद्अनुषंगीक येणाऱ्या खर्चास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.९३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार व शासनाच्या आदेशाप्रमाणे यापुर्वी रु.४५ कोटी मात्रचा निधी देण्यात आलेला आहे. त्या निधीच्या खर्चाबाबतचा अहवाल महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडून घेण्यात यावा व त्यानुसार सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०६** **मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील कंपाऊंड भिंतीवर परफोरेटेड एम.एस.शिटचे कंपाऊंड करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथिल श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचे सुरक्षा ऑडीटनुसार तसेच दि.२५/१०/२०१३ रोजी मा. पोलिस अधिक्षक यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये मंदिर परिसराचे दक्षिण बाजुकडील कम्पाऊंड भिंतीचे राहीलेल्या भागातील बांधकाम करुन संपूर्ण भिंतीवर एम.एस. परफोरेटेड शिटस्चे कम्पांऊंड करण्याचे ठरले आहे. त्यानुसार सदर कम्पाऊंडसाठी खालिल कामे करणे आवश्यक आहे.

१. धबधब्याचे पाठीमागिल पूर्व- पश्चिम भिंतीचे वीट बांधकाम व प्लास्टर करणे
२. धबधब्याचे पश्चिमेस नगर- मनमाड रस्त्यालगत विद्युत डी पी जवळ असलेल्या सध्याचे चेनलींग जाळीचे ठिकाणी वीट बांधकाम व प्लास्टर करणे.
३. सदर गेट नं.४ चे पश्चिमेकडील संपुर्ण कम्पाऊंट भिंतीवर एम.एस. परफोरेटेड शिटचे कम्पाउंड करणे.
४. गेट नं. ४ चे पूर्व बाजुकडील कम्पाऊंड भिंतीवर सध्या असलेली स्टेनलेस स्टील जाळी काढून त्या ठिकाणी एम एस परफोरेटेड शिटचे कम्पाऊंड करणे.
५. नव्याने बांधकाम केलेली कंम्पाऊंड भिंत व एम.एस. परफोरेटेड शिटचे कम्पाऊंडला रंगकाम करणे.

वर नमूद केलेप्रमाणे संपूर्ण कामासाठी सोबत जोडलेल्या एस्टीमेटनुसार एकूण अंदाजे रु. रु.६,७०,७२२/- (अक्षरी रुपये सहा लक्ष सत्तर हजार सातशे बावीस) मात्र इतका खर्च येईल. तरी सदर खर्चास व याकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.९३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कामांसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलंबद निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,७०,७२२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७** **अधिकारी निवासस्थानातील ४३ सदनिकांमध्ये किचन ट्रॉली, तसेच पोटमाळयावरील भागात व कडप्यामध्ये असलेल्या कपाटांना प्लायवूड लॅमिनेट वापरुन झडपा तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकल (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतांची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करणेत येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे अधिकारी निवासस्थांनाकरीता साईनगर परिसरात तीन इमारती (प्रत्येकी चार रुमचे ६ फ्लॅट) तसेच ५०० रुम परिसरात मा. कार्यकारी अधिकारी निवासस्थान व अधिकारी निवासस्थांनाकरीता चार इमारती (प्रत्येकी चार रुमचे ६ फ्लॅट) असे एकूण ४३ सदनिका सन २००० ते २००५ या कालावधीत बांधणेत आलेल्या आहेत. सदर बांधकामाचे वेळेस प्रत्येक सदनिकेत किचन रुममध्ये कडप्पा वापरुन किचन ओटा, कडप्पा वापरुन बांधकामात रॅक (कपबोर्ड) तसेच पोटमाळा तयार करणेत आलेले आहेत. सदर ठिकाणी किचन ओट्याकरीता किचन ट्रॉली, पोटमाळ्यावर कपबोर्डकरीता प्लायवूड लॅमिनेट वापरुन शटर करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:-** सदर ४३ सदनिकांकरीता एकूण ३४५ र.फुट किचन ट्रॉली व पोटमाळा व कपबोर्ड करीता ४७८५ चौ.फुट शटर (झडपा) करणे आवश्यक आहे. याकरीता खालील पर्यायाचा विचार करता येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

**I) पर्याय क्र. १**

| **अ.नं.** | **तपशिल** | **परिमाण/एकक** | **दर रु.** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| किचन ट्रॉली | CRC पाईप फ्रेम वापरुन पावडर कोटेड कॅरीअर्स तसेच SS-२०२ icon basket वापरुन किचन ट्रॉली करणे | ३४५.०० र.फुट | २१५०/- प्रती र.फुट | ७,४१,७५०/- |
| पोटमाळा व कपाटासांठी शटर्स | वॉटर प्रुफ Marine प्लायवूड व Matt finish laminate वापरुन शटर्स तयार करणे | ४७८५.०० र.फुट | ५२५/- प्रती र.फुट | २५,१२,१२५/- |
| | एकूण रुपये | | | ३२,५३,८७५/- |
| | अधिक ५% contengencies | | | १,६२,६९४/- |
| | **एकूण रक्कम रुपये** | | | **३४,१६,५६९/-** |

**II) पर्याय क्र. २**

| **अ.नं.** | **तपशिल** | **परिमाण/एकक** | **दर रु.** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| किचन ट्रॉली | S.S. २०२ Frame, SS.२०२ Carrier, SS २०२ icon basket वापरुन किचन ट्रॉली करणे | ३४५.०० र.फुट | २६५०/- प्रति र.फुट | ९,१४,२५०/- |
| पोटमाळा व कपाटासांठी शटर्स | वॉटर प्रुफ Marine प्लायवूड & Glossy Finish laminate वापरुन शटर्स तयार करणे | ४७८५.०० र.फुट | ५९०/- प्रति र.फुट | २८,२३,१५०/- |
| | एकूण रुपये | | | ३७,३७,४००/- |
| | अधिक ५% contengencies | | | १,८६,८७०/- |
| | **एकूण रक्कम रुपये** | | | **३९,२४,२७०/-** |

**विभागाचा अभिप्राय :-** सदर सदनिका अधिकारी यांचे निवासासाठी असल्याने तसेच सदरचे काम उच्च दर्जाचे व टिकाऊ होणेचे दृष्टीने विचार करता पर्याय क्र.२ नुसार किचन ट्रॉलीज करीता एस.एस. मटेरीअल वापरुन तयार करता येतील. तसेच पोटमाळा व कपाटे यांकरीता प्लायवूड व ग्लॉसी लॅमिनेट व एस.एस. हँडल, बिजागिरी इ. वापरुन शटर्स तयार करता येईल. याकरीता अंदाजे एकूण ३९,२४,२७०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी याकामी येणारे एकूण अंदाजे रु.३९,२४,२७०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम अशाप्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून निविदा मागवून काम करुन घेणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.९३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिकारी निवासस्थानातील ४३ सदनिकांमध्ये किचन ट्रॉली, तसेच पोटमाळयावरील भागात व कडप्प्यामध्ये असलेल्या कपाटांना प्लायवूड लॅमिनेट वापरुन झडपा बसविणेकामी तज्ञ किचन सल्लागाराकडून डिझाईन तयार करणेत यावे व त्यानंतर विहीत पध्दतीने निविदा मागविणेत याव्यात. याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३९,२४,२७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०८** **श्री साई प्रसादालय इमारत पहिला मजला येथील माहिती तंत्रज्ञान विभागाचे हॉलमध्ये वर्कस्टेशन फर्निचर बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद :-** अधिनियम कलम- २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये *"मंदीर व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतूद आहे. "*

**प्रस्तावना :-** संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प कार्यान्वीत आहे. संस्थानचे नविन श्री साई प्रसादालयातील पहिल्या माळ्यावरील उत्तरेकडील हॉलमधे सध्या डाटा सेंटर व माहिती तंत्रज्ञान विभागाचे कार्यालय करणेत आले आहे. सदर ठिकाणी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे कर्मचारी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कर्मचारी यांचेकरीता दैनंदीन कामासाठी २० वर्कस्टेशन यापुर्वी खरेदी करणेत आलेले आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.०३/१०/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये सदर ठिकाणी सध्याची बैठक व्यवस्था अपूर्ण पडत असून आणखी २० कर्मचाऱ्यांकरीता वर्कस्टेशन करावेत अशी विनंती केली आहे.

**प्रस्ताव :-** यापुर्वी माहिती तंत्रज्ञान विभागासाठी केलेले वर्कस्टेशन प्रमाणे आणखी २० वर्कस्टेशन करणेस खालील प्रमाणे खर्च येईल.

**A) Bill Of Quantities**

| S. N. | DISCRIPTION OF WORK | QTY | UNIT | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **L' Shaped work station with Partition**<br>**Size: 1500X1500X600D**<br>**Partition: (48.6 Sq.Mtrs.)** Providing and Installing 60mm Thk Panel based system with partition ht. 1200mm, with plain metal tiles below worksurface level and fabric magnetic/Fabric Tackable/ White board (as required) tile above worksurface level, One magnetic pin up & one board marker should be of 750mm. Electirc power sockets should be above table top and data voice outlets at skirting level.<br>**Table top: 1500x1500x600mm 20 Nos. & Gable End 570x750mm – 30Nos.** Work top and Gable ends shall be made of 25mm thick Plain Particle board interior grade. The top shall be laminated with Post forming laminate of 1mm thickness of approved shade and glue of PVAC. Bottom shall have a backing laminate of minimum 0.6mm thickness. All the edges of work surface shall be provided with machine pressed 2mm thick PVC lipping glued with hot melt EVA glue. with required hardware fittings and understructure series. | **20** | **Sets.** | **30,000/-** | **6,00,000/-** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **Pedestal: (20 Nos.)**3 drawer Free standing pedestal of size 650ht X400wX450d with wooden facia with central locking | | | | |
| | **Key Board & CPU Trolley: (20 Sets.)**Standard plastic keyboard pull out tray and metal CPU trolley. | | | | |
| | | | | Total Amount : | **6,00,000/-** |

उपरोक्त प्रमाणे एकूण २० वर्कस्टेशन बनवून घेणेकामी अंदाजे रु.६,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**इकडील विभागाचा अभिप्रायः-** तरी माहिती तंत्रज्ञान विभागाकरीता व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाजाकरीता एकूण २० वर्कस्टेशन बनविणेस व याकामी येणारे अंदाजे रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९ मौजे निमगाव-कोऱ्हाळे, ता.राहाता येथील संस्थानचे गट नं.१८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतुद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे खालीलप्रमाणे शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.

१. श्री साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कुल, शिर्डी
२. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी
३. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी
४. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी

वरीलपैकी इंग्लिश मेडीयम, कन्या विद्या मंदिर व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या इमारती शिर्डी सर्व्हे नंबर १०८, १०९ मधिल संस्थान मालकीचे जागेत आहेत. परंतु कनिष्ठ महाविद्यालयाला कायमस्वरुपी इमारत उपलब्ध नसल्याने त्यांचे वर्ग सध्या मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर १७२ मधील साईआश्रम भाग -२ चे एका इमारतीत भरविण्यात येत आहेत. तसेच सध्याचे शैक्षणिक संकुलातही वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे वर्गांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे इंग्लिश मेडीयम स्कुलचे वर्ग दोन सत्रात भरवावे लागत आहेत. या बाबींचा विचार करुन संस्थान संचलीत सर्व शैक्षणिक संस्थांकरिता एकाच ठिकाणी कायम स्वरुपी असे अद्ययावत शैक्षणिक संकुल उभारणेसाठी प्रस्ताव सादर करावा अशी सुचना मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या होत्या. तसेच याकरिता जागा निश्चित करणेसाठी मा.अध्यक्ष, मा. सदस्य -तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा.कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनींची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८३ मधील जागा नियोजित शैक्षणिक संकुलासाठी निश्चित करणेत यावी असे ठरले आहे.

**प्रस्ताव :-** मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता. राहाता येथील संस्थान मालकीचे गट नंबर १८३ मधील जागेचे क्षेत्र ५ हेक्टर ४० आर इतके आहे. या जागेत संस्थानच्या वरील सर्व शैक्षणिक संस्थांकरिता वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सांस्कृतिक हॉल, क्रिडांगण, वाहनतळ इत्यादी पायाभूत सोयी - सुविधा उभारता येतील. त्यासाठी प्रथम सदर संस्थांच्या भविष्यातील गरजा विचारात घेऊन त्यानुसार नियोजित सुविधांचे स्वरुप ठरवावे लागेल. त्याकरिता सदर नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करणेसाठी या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणे आवश्यक आहे. वर नमूद संस्थान संचलीत शैक्षणिक संस्थांचे मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी शैक्षणिक संकुलाकडे सध्या वापरात असलेल्या वर्ग खोल्या तसेच भविष्यात आवश्यक असलेल्या वर्ग खोल्या व इतर आवश्यक पायाभूत सुविधा यांचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

**अ) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| सध्या वापरात असलेली खोल्यांची संख्या | | | | | | भविष्यात लागणारी खोल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. नं. | इमारत | साईज (मीटर) | | संख्या | क्षेत्र (चौ.मी) | साईज (मीटर) | | संख्या | क्षेत्र (चौ.मी) |
| १ | वर्गखोल्या | ७.६२ | ९.१५ | ४३ | २९९८.०९ | ७.६२ | ९.१५ | ७२ | ५०२०.०६ |
| २ | कार्यालय/स्टोअर रुम | ६.१० | ९.१५ | १ | ५५.८२ | ६.१० | ९.१५ | ७ | ३९०.७१ |
| ३ | शिक्षक कक्ष | -- | | -- | | ९.१५ | ६.१० | २ | १११.६३ |
| | | | | | ०.०० | ९.१५ | ९.१५ | ३ | २५१.१७ |
| ४ | प्रसाधनगृह/कार्यालय/ रुम | ६.१० | ६.१० | ८ | २९७.६८ | ६.१० | ९.१५ | २ | १११.६३ |
| | | | | | ०.०० | ६.१० | ६.१० | ६२ | २३०७.०२ |
| ५ | प्रयोगशाळा/आय.टी.लॅब | १०.६७ | १५.२४ | ४ | ६५०.४४ | १०.६७ | १५.२४ | ८ | १३००.८९ |
| ६ | हॉल/इनडोअर गेम हॉल | -- | | -- | | ३३.५४ | ४२.६८ | ४ | ५७२५.९५ |
| ७ | ड्रॉईंग हॉल/संगीत हॉल | -- | | -- | | ९.१५ | १५.२४ | ५ | ६९७.२३ |
| ८ | प्ले रुम | -- | | -- | | १५.२४ | १५.२४ | १ | २३२.२६ |
| ९ | ग्रंथालय | -- | | -- | | १२.१९ | २४.३८ | ४ | ११८८.७७ |
| १० | रिडींग हॉल | -- | | -- | | ९.१५ | १८.३० | ४ | ६६९.७८ |
| ११ | जिमखाना | -- | . | -- | | १२.१९ | १५.२४ | २ | ३७१.५५ |
| १२ | स्पोटर्स रुम (स्टोअर) | -- | | -- | | ३.०५ | ६.१० | ४ | ७४.४२ |
| | परीक्षा केंद्र | -- | | -- | | ७.६२ | ९.१५ | २. | १३९.४५ |
| | एकुण- | | | ५६ | **४००२.०३** | | | १८२ | **१८५९२.५०** |

## ब) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर,शिर्डी

| सध्या वापरात असलेली खोल्यांची संख्या | | | | | | भविष्यात लागणारी खोल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ नं. | इमारत | साईज (मीटर) | | संख्या | क्षेत्र (चौ.मी) | साईज (मीटर) | | संख्या | क्षेत्र (चौ.मी) |
| १ | वर्गखोल्या | ७.६२ | ९.१५ | ८ | ५५७.७८ | ७.६२ | ९.१५ | १६ | १११५.५७ |
| | जिमखाना | ९.१५ | ९.१५ | ५ | ४१८.६१ | ९.१५ | ९.१५ | ९ | ७५३.५० |
| २ | कार्यालय/ | ६.१० | ९.१५ | १ | ५५.८२ | ६.१० | ९.१५ | १ | ५५.८२ |
| ३ | शिक्षक कक्ष | ६.१० | ९.१५ | २ | १११.६३ | ६.१० | ९.१५ | ४ | २२३.२६ |
| ४ | प्रसाधागृह/ कार्यालय /रुम | ६.१० | ६.१० | १४ | ५२०.९४ | ६.१० | ६.१० | २१ | ७८१.४१ |
| ५ | प्रयोगशाळा/ आय.टी.लॅब/ हॉल | ९.१५ | १५.२४ | ३ | ४१८.३४ | ९.१५ | १५.२४ | ५ | ६९७.२३ |
| ६ | ग्रंथालय | १२.१९ | २४.३८ | १ | २९७.१९ | १२.१९ | २४.३९ | २ | ५९४.६३ |
| ७ | ग्रंथालय हॉल/ | ९.१५ | १८.३० | १ | १६७.४५ | ९.१५ | १८.३० | २ | ३३४.८९ |
| ८ | संगीत हॉल | १५.२४ | ३०.४८ | १ | ४६४.५२ | १५.२४ | ३०.४८ | १ | ४६४.५२ |
| ९ | स्पोटर्स रुम | ३.६६ | ३.०५ | १ | ११.१६ | ३.०५ | ३.६६ | १ | ११.१६ |
| १० | परीक्षा केंद्र | ६.७१ | ८.२३ | २ | ११०.४५ | ६.७१ | ८.२३ | २ | ११०.४५ |
| | एकुण- | | | ३९ | **३१३३.८८** | | | ६४ | **५१४२.४३** |

## क) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| सध्या वापरात असलेली खोल्यांची संख्या | | | | | | भविष्यात लागणारी खोल्यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ नं. | इमारत | साईज (मीटर) | | संख्या | क्षेत्र (चौ.मी) | साईज (मीटर) | | संख्या | क्षेत्र (चौ.मी) |
| १ | वर्गखोल्या | ९.१५ | ९.१५ | २० | १६७४.४५ | ९.१५ | १०.६७ | ३० | २९२८.९२ |
| २ | हॉल | १८.३० | ९.१५ | ४ | ६६९.७८ | ९.१५ | १८.३० | ४ | ६६९.७८ |
| ३ | स्टोअर रुम/ प्रसाधन गृह | ६.१० | ६.१० | २० | ७४४.२० | ६.१० | ६.१० | १८ | ६६९.७८ |
| ४ | हॉल/ग्रंथालय/ परीक्षा केंद्र/ कॉमन हॉल | ९.१५ | ९.१५ | ९ | ७५३.५० | ९.१५ | ९.१५ | १५ | १२५५.८४ |
| ५ | शिक्षक कक्ष/ कॅंटीन हॉल | ६.१० | ९.१५ | ५ | २७९.०८ | ६.१० | ९.१५ | ५ | २७९.०८ |
| ६ | सांस्कृतिक हॉल | १५.२४ | ३०.४८ | १ | ४६४.५२ | १५.२४ | ३०.४८ | १ | ४६४.५२ |
| ७ | जिमखाना | १५.२४ | १८.२९ | १ | २७८.७४ | १५.२४ | १८.२९ | १ | २७८.७४ |
| | | एकुण- | | ६० | **४८६४.२६** | | | ७४ | **६५४६.६४** |

**ड) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी सध्या कार्यशाळा व वर्गखोल्या मिळून एकुण ३,९०० चौ.मी.इतके चटई क्षेत्र असलेले बांधकाम वापरात आहे. भविष्यातील वाढ विचारात घेता अंदाजे ९,३६० चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र आवश्यक राहिल. याबाबत सध्याच्या व भविष्यातील वाढीचा विचार करुन केंद्रशासनाच्या प्रमाणकांनुसार १० एकर अधिक विद्यार्थी वसतीगृह व कर्मचारी निवासस्थान यासाठी आणखी १० एकर याप्रमाणे सुमारे २० एकर जमिनीची तरतुद करुन प्रकल्प विकसित करावा असे प्राचार्य ,औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी कळविले आहे.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, कनिष्ठ महाविद्यालय व औ.प्र.संस्था यांचेकरिता भविष्यातील वर्ग खोल्या व इतर अनुषंगिक पायाभूत सुविधा विचारात घेता एकूण अंदाजे ५,३०,००० चौरस फुट क्षेत्रफळाचे बांधकाम करावे लागेल. त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| नियोजित इमारतींचे अंदाजे क्षेत्रफळ (प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार) | = | ५,३०,००० चौ. फुट |
| इमारत बांधकामाचा अंदाजे खर्च रु.१,५००/- प्रतिचौरस फुट प्रमाणे | = | रु. ८० कोटी |
| परीसर विकास, संरक्षण भिंत इत्यादी खर्च (इमारत बांधकामाच्या अंदाजे २५% रक्कम) | = | रु. २० कोटी |
| प्रकल्पाचा एकूण प्राथमिक ढोबळअंदाजित खर्च | = | रु. १०० कोटी |

<u>**विभागाचा अभिप्राय-**</u> प्रादेशिक विकास योजना (शिर्डी विकास केंद्र) नकाशामध्ये मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर १८३ मधील जागा हरीत पट्टयात दर्शविली आहे. सदरहू जागा हरीत पट्टयातुन वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेसाठीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून त्याबाबत अद्याप अंतीम अधिसूचना काढण्यात आलेली नाही. सदरहू जागेचा रहिवास विभागात समावेश झाल्यानंतरच वरील प्रकल्पाचे बांधकामासाठी परवानगी मिळू शकेल.

वरील प्रमाणे भविष्यात आवश्यक असणारे सर्व बांधकाम एकाचवेळी करणे व्यवहार्य होणार नाही. त्याकरिता सदर प्रकल्प गरजेनुसार टप्प्या टप्प्याने (Phased Manner) बांधकाम करणे उचित होईल. सदरहू प्रकल्प महत्वाचा व मोठ्या स्वरुपाचा असल्याने या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर तसेच आर्किटेक्ट नेमणूकीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरहूकामी या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१० साईआश्रम भाग-०२ येथील हॉलसाठी एम.एस. सिंगल बेडस् खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः- ०१.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय समंत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम प्रकल्पातील भाग-०२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. "

**०२.** मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.९६३ संमत करणेत आला आहे.

"... निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या कॉटस्च्या नमुन्यांची समितीने पाहणी केली. यानंतर चर्चा होऊन, खरेदी करावयाच्या कॉटस्चा वापर हा साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०२ येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये करावयाचा असल्याने ते मजबुत होण्याचे दृष्टीने सदर कॉटसचे डिझाईन सुधारीत करुन त्यानुसार निविदासादरकर्त्यांकडून एक नमुना आगोदर तयार करुन घ्यावा व सदरचे नमुने पाहुन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले."

**०३.** उपरोक्त क्रमांक ०२ चे निर्णयास अनुसरुन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७१८ अन्वये खालील प्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

" .. यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पाचे भाग ०२ येथील हॉलसाठी एम. एस. सिंगल बेडस् खरेदी करणेसाठी पुरठाधारकांकडून बेडस्चे नमुने मागविणेत यावे असे ठरले."

**प्रस्ताव :-** निविदासादरकर्ते ठेकेदार यांनी निविदेसोबत सादर केलेले बयाना रकमेचे डी.डी. परत मिळणेकामी विनंती केली होती. त्यानुसार इकडील विभागाचे दि.१७/०४/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेऊन संबंधीत ०४ ही ठेकेदार यांची बयाणा रक्कम त्यांना चेकव्दारे परत करण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा उघडणेत आल्या आहेत. तसेच निविदा सादरकर्त्यांनी निविदेसोबत सादर केलेली बयाणा रक्कम सर्व निविदा सादरकर्त्यांना परत करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर निविदा रद्द करुन याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/११/२०१३ चे सभेतील निर्णयानुसार सुधारीत डिझाईन नुसार नव्याने निविदा मागविणे उचित होईल असे मत आहे. त्यासाठी दिनांक ०४/११/२०१३ रोजीचे सभेत चार प्रकारच्या एम. एस बेडस्ची छायाचित्रे दाखविणेत आलेली होती. त्यापैकी क्र.१ चे छायाचित्र हे गोदरेज कं. यांनी संस्थानचे व्दारावती भक्तनिवास इमारतीसाठी पुरविलेल्या सिंगल बेडचे होते व इतर तिन छायाचित्रे ही इंटरनेटचे माध्यमातून घेतलेली होती. सदरचे चार छायाचित्रांपैकी मा.अध्यक्ष साो यांनी छायाचित्र क्र.०२ व ०३ नुसार नमुने तयार करणेचे निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील विभागामार्फत दोन नमुने तयार करुन घेणेत आले असून, ते साई निवास अतिथीगृह येथे ठेवणेत आलेले आहेत.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** वर नमूद केलेप्रमाणे तयार करणेत आलेल्या नमुन्यांपैकी योग्य त्या नमुन्याची निवड करुन त्यानुसार नव्याने ई-टेंडर पध्दतीने निवीदा मागविता येतील असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०२ येथील हॉलसाठी बनविणेत आलेल्या एम.एस. सिंगल बेडस्च्या नमुन्यांची मा.कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी करुन योग्य नमुन्याची निवड करावी व निवडलेल्या नमुन्यांच्या खरेदीकामी ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.११** **दिनांक ०१ ऑक्टोबर- २०१७ पासून श्री साईंचे शतकमहोत्सवी पुण्यतिथी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतूद :-** सदरहू अधिनियमातील कलम २१ चे पोटकलम (१) मधिल खंड (झ) व (त्र) तसेच पोटकलम (२) मधिल खंड ( दोन ) हे विषयांकित प्रयोजनासाठी लागू होतील असे मत आहे.

**प्रस्तावनाः** थोर संत श्री साईबाबा हे श्री क्षेत्र शिर्डी येथे विजयादशमी (दसरा) या शुभदिनी मंगळवार, दिनांक १५ऑक्टोबर, १९१८ रोजी पंचत्वात विलीन झाले. श्री साईंचे महानिर्वाणास सन २०१८ मध्ये एक शतक पूर्ण होईल. त्यानिमित्त संस्थान तर्फे "श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८ (विजया दशमी)अखेर" साजरा करण्याचे प्रस्तावित आहे." श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सव - सन २०१८ " हा शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव म्हणून साजरा करण्यात येईल.

श्री साईबाबांच्या शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षात लाखो साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देतील. तसेच शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव काळात ३० ते ४० लाख साईभक्त श्री साईबाबांचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सुधारणा करणे व नवीन सुविधा उभारणे अत्यावश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील पायाभूत सुविधांचा समावेश असणे गरजेचे आहे.

१. शिर्डी शहरातील अंतर्गत रस्ते व शिर्डीला जोडणारे राज्यमार्ग व इतर प्रमुख रस्ते रुंदीकरण व विकसीत करणे.

२. शिर्डी शहर व लगतचे परिसरात वाहनतळांची निर्मिती करणे.

३. शिर्डी शहर व लगतचे परिसरात पुरेशा सार्वजनिक प्रसाधनगृहांची उभारणी करणे.

४. संभाव्य गर्दी विचारात घेऊन सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करणे.

५. घनकचरा व्यवस्थापन व मलनि:सारण व्यवस्था करणे.

६. विद्युत वितरण व्यवस्थेचे नुतनीकरण व विस्तारीकरण करणे.

यापुर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे मा.अध्यक्ष यांनी दि.०७/१२/२०१०रोजी चे निवेदनाव्दारे सन्मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडेस सन २०१७ -२०१८ मधील शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त विकास प्रकल्प राबविणेसाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करुन देणेसाठी विनंती केली होती. तसेच तत्कालीन सन्मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सन्मा.नगरविकास मंत्री (भारत सरकार) यांना सदरहू विषयाबाबत चर्चा करणेसाठी वेळ मिळणेबाबत दि.०६/११/२०१० रोजीचे निवेदनाव्दारे विनंती केली होती.

साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष साजरे करण्यासाठी पुर्वतयारी करण्याचे दृष्टीने श्री साईबाबा संस्थान,शिर्डी. नगरपंचायत तसेच शासनाचे नगरविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर संबंधित विभाग मिळून एकत्रितरित्या कृती आराखडा तयार करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक असलेबाबत संस्थानतर्फे दिनांक ३०/०३/२०१३ व दिनांक १३/०५/२०१३ रोजीचे प्रस्तावांव्दारे शासनाकडे

पाठपुरावा करणेत आला होता. त्यास अनूसरुन महाराष्ट्र शासनाने विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सांसवि २०१३/ प्र.क.१/का.१६ दिनांक २२ ऑक्टोबर २०१३ अन्वये अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली सदरहू शासन निर्णय सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

शिर्डी व लगतच्या परिसरांचा सर्वांगिन विकास आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्थेकडुन प्रामुख्याने खालील नमुद कामे करुन घेता येतील.

1. Prepare a Conceptual plan for development of land at Shirdi and nearby villages.
2. Identify alternate resource or avenues for resource mobilisation.
3. Review the regional plan for Shirdi and nearby villages and review the Development Plan (DP) of Shirdi Town and suggest modifications for planned and controlled development.
4. Prepare a Tourism Master Plan for Shirdi taking existing facilities into account.
5. Prepare an Establishment for additional activities being carried out by the Trust.
6. Prepare project report and action plan for Overall Development of Shridi Town and nearby villages.

श्री साईंचे शतकमहोत्सवी पुण्यतिथी वर्ष साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत शासनास सादर करणेसाठी शिर्डी व लगतच्या परिसरांचा सर्वांगिन विकास आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** ०१) श्री साईंचे शतकमहोत्सवी पुण्यतिथी वर्ष साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याचे दृष्टीने शिर्डी व लगतचा परिसर तसेच संस्थान परिसराचा सर्वांगिण विकास आराखडा तयार करुन संस्थानमार्फत शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घ्यावी लागेल.

२) अशा प्रकारची कामे करणाऱ्या सल्लागार संस्थांकडून वर्तमान पत्रात विहीत पध्दतीने जाहिरात देवून RFP (Request For Proposal) मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त शिर्डी व लगतचे परीसराचा विकास आराखडा तयार करणेकामी सल्लागार नेमणेसाठी व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त शिर्डी व लगतचे परीसराचा विकास आराखडा तयार करणेकामी या क्षेत्रातील नामांकित, अनुभवी व मोठया स्वरुपाची कामे केलेल्या ०५ सल्लागार संस्थांना निमंत्रित करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१२** **श्री साईबाबा मंदिर परिसर व साईप्रसाद परिसरामध्ये निघणारा घनकचरा ठेवणेकामी कचरा कुंडीसाठी शेडचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:** संस्थानचे मंदिर परिसर व साईप्रसाद परिसरामध्ये दैनंदिन साफसफाई करून निघणारा घनकचरा साईप्रसाद परिसरातील साईनिवास अतिथीगृहाजवळील कारपार्कींगचे उत्तर बाजूस साठविण्यात येत असून साठविण्यात आलेला कचरा स.९ व दु.१.३० वाजता कचरा गाडीद्वारे उचलून संस्थानचे घनकचरा डेपोवर टाकण्यात येत आहे. याबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी सदर कचरा दर्शनी भागात कचरा दिसत असल्याने तो इतरत्र दुसरीकडे साठविण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

**मागणी:** उपरोक्त भागात कचरा साठविणेसाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने सदर कचरा साठविणेसाठी या ठिकाणी तात्पुरते शेड बांधून मिळणेबाबत दि.११/१०/२०१३ रोजीचे आरोग्य विभागाकडील टिपणीअन्वये कळविण्यात आले आहे.

**विभागाचा अभिप्राय :**आरोग्य विभाग यांचे मागणीनुसार सोबत जोडलेले ले-आऊट प्लॅनमध्ये दर्शविलेले ठिकाणी युरिनल ब्लॉकजवळ कचराकुंडी शेड तयार करता येईल. त्यासाठी खोदाई, दगडी/ विट बांधकाम, प्लास्टर इ. कामे इकडील विभागामार्फत विहीत पद्धतीने मटेरियल खरेदी करून करता येतील. तसेच स्ट्रक्चरल, ग्रील व पाईप बसविणेचे काम मेकॅनिकल विभागामार्फत करून इकडील विभागाकडून पत्रे बसविता येतील. याकामी अंदाजे रुपये ९६,९००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी विषयांकीत याकामी येणारे अंदाजे रुपये ९६,९००/- खर्चास मान्यता मिळणेस व सदरचे काम विहीत पद्धतीने कोटेशन मागवुन विभागामार्फत करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसर व साईप्रसाद परिसरामध्ये निघणारा घनकचरा ठेवणेकामी कचरा कुंडीसाठी शेड तयार करणेसाठी लागणारे मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९६,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१३** **संस्थानचे कनकुरी रोड येथील ओव्हर हेड टँक येथे संडास बाथरुमची व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या ठिकाणी पाणीपुरवठा करणेकरीता पाणीपुरवठा योजना करणेत आलेली आहे. याकरीता कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातून पाणी पुरवठा करणेत येत आहे. सदर ठिकाणी पाणी शुध्दीकरण करणेत येवून ते १ फुट पाईपलाईनव्दारे संस्थानचे कनकुरी रस्त्यावरील ओव्हर हेड टँक येथे साठविण्यात येवून सदर टाकीतून संस्थानचे विविध ठिकाणी पाणी वितरण करण्यात येते. सदर ओव्हर हेड टँक येथे पाणी वितरण करणेसाठी तीनही शिप्टमध्ये पाणी पुरवठा विभागामार्फत कर्मचारी नियुक्त करण्यात येतात. तसेच ओव्हरहेड टँक येथे पाणी पुरवठा विभागाकडील प्लबिंग साहित्य, वेगवेगळया साईजचे पाईप ठेवणेसाठी स्टोअर करण्यात आले आहे. करीता या ठिकाणी संरक्षण विभागामार्फत तिन शिफ्ट मध्ये सुरक्षा कर्मचारी नेमण्यात येतात. तीन शिप्टमध्ये प्रत्येकी दोन असे एकूण सहा कर्मचारी दररोज नियुक्त करण्यात येतात. तसेच इतर वेळी जनरल शिप्ट मध्ये कर्मचारी नेमवून तेथील कामे करण्यात येतात.

सदर कर्मचाऱ्यांसाठी तेथे संडास- बाथरुमची व्यवस्था नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना शौचालयात जाणेसाठी डयुटी पॉईंट सोडून नविन प्रसादालय किंवा मंदिर परिसर याठिकाणी यावे लागते. याकरीता ओव्हर डेड टँक या ठिकाणी संडास बाथरुमची व्यवस्था करणेबाबत पाणी पुरवठा यांनी १६/०९/२०१३ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे.

याबाबत उपरोक्त अडचणींचा विचार करता त्याठिकाणी संडास बाथरुम बांधकाम करणेकरीता DSR २०१३-२०१४३ चे दरानुसार अंदाजे रु.९३,५१५/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम विभागामार्फत करता येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे मटेरीअल आवश्यक आहे.

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण/एकक |
|---|---|---|
| ०१ | सिमेंट | ३५ गोणी |
| ०२ | खडी | १.०० ब्रास |
| ०३ | विट | २५०० नग |
| ०४ | वाळू | १.५ ब्रास |
| ०५ | स्टिल | ११० किलो |
| ०६ | डबर | ०.५ ब्रास |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त काम करणेसाठी विभागाकडील उपलब्ध मटेरीअल वापरता येईल तसेच ज्या मटेरीअलचे दर मंजूर आहे ते मागील मंजूर दरात करुन घेता येईल. तरी उपरोक्त कामासाठी मजुरी व मटेरीअल करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रु.९३,५१५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१४ साईआश्रम ०१ येथील आर ब्लॉक इमारतीचे तळमजल्यावरील दुकान गाळयांमध्ये ध्वनिक्षेपन विभागाकरीता अल्यु.पार्टीशन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-** २१ (१) विश्वस्तव्यवस्थेच्या निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे. "

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि.११/०४/२०१३ पासून साई आश्रम भाग-०१ हा प्रकल्प साई भक्तांसासाठी खुला करणेत आलेला आहे. साऊंड सिस्टिम कंट्रोल रुमसाठी तसेच अनाऊंसमेन्ट डेस्क वापरासाठी उत्तर बाजुकडील गाळा नं.०३ ध्यनिक्षेपन विभागासाठी देण्यात आला आहे. व गाळा नं.०२ हा बगीचा विभागाचे वापरासाठी देणेत आलेला आहे. गाळा नं.०२ व ०३ चे मधे पार्टीशन करुन मिळावे म्हणून इकडील विभागास दि.१२/०९/२०१३ रोजीचे पत्रान्वये ध्यवनिक्षेपन विभाग प्रमुख यांनी कळविले आहे.

**प्रस्ताव :-** सदरचे ठिकाणी ॲल्यु. पार्टीशन करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Description | Qty/unit | Approx . Rate | Amount (Rs) |
|---|---|---|---|---|
| 01 | Providing & Fixing in position colour anodised extruded aluminium partition, partly glazed & partly laminated Size (4.50 m x 4.50m) | 20.29 $M^2$ | 2137.00 | 43,233.75.00 |
| | | | **Total Rs** | **43,234.00** |

उपरोक्त तपशिलप्रमाणे सदर कामी रु.४३,२३४/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय :-** तरी सदरचे काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे रु.४३,२३४/- मात्रचे खर्चास मान्यतेस्तव मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम ०१ येथील आर ब्लॉक इमारतीचे तळमजल्यावरील दुकान गाळयांमध्ये ध्वनिक्षेपन विभागाकरीता अल्युमिनीअम पार्टीशन करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४३,२३४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१५ श्री साईबाबा संस्थानकडे नियुक्ती असलेल्या श्रेणी- ०१ च्या अधिकाऱ्यांकरीता निवासव्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** २१(१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१, च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-

झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे; अशी तरतूद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल कलम १३ (४) नुसार संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमाने तिचे कर्तव्ये व काम पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणुक करता येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्तवना:-** मा. कार्यकारी अधिकारी यांचे व्यतिरिक्त संस्थानकडे उपकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी यांची शासनामार्फत नियुक्त करणेत आली आहेत. तसेच संस्थानमार्फत प्रशासकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, वैद्यकीय संचालक वैद्यकीय अधिक्षक यांची नियुक्त करणेत आलेले आहेत. सध्या विविध इमारतीमध्ये सदर अधिकाऱ्यांकरीता (९७०.०० चौ.फुट) क्षेत्रफळाचे फ्लॅट उपलब्ध

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करुन देण्यात आले आहे. शिर्डी येथे नियुक्त करण्यात आलेले शासकीय अधिकारी, संस्थान हॉस्पीटलमध्ये नियुक्त करण्यात आलेले डॉक्टर्स यांना संस्थान मार्फत निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे निवासव्यवस्था अपुरी पडत आहे.

**प्रस्ताव :-**करीता नव्याने संस्थान अधिकाऱ्यांकरीता संस्थान अधिकाऱ्यांकरीता निवासस्थानांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यापुर्वी मा. यापुर्वी मा. कार्यकारी अधिकारी यांचेसाठी बंगल्याचे बांधकाम करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे खालील वरिष्ठ अधिकाऱ्यांकरीता बंगल्याचे बांधकाम करणेस हरकत नाही. अशी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत समक्ष चर्चा झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| उपकार्यकारी अधिकारी | ०१ | मुख्य लेखाधिकारी | ०१ |
| प्रशासकीय अधिकारी | ०५ | वैघकीय संचालक | ०१ |
| कार्यकारी अभियंता | ०१ | वैद्यकीय अधिक्षक | ०१ |

महाराष्ट्र शासनाचे, सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय क्र. शानिवा-१५०९/प्र.क्र.३२०/०९/२३-अ, दि.१९/०४/२०११ अन्वये गट अ श्रेणीतील अधिकाऱ्यांकरीता १७५० चौ.फुट क्षेत्रफळाचे शासकीय निवासस्थाने अनुज्ञेय ठरविण्याचा निर्णय झालेला आहे. मा. कार्यकारी अधिकारी सो। यांचेकरीता संस्थानचे सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पैकी मधील जागेत २०२० चौ.फुट क्षेत्रफळाचा बंगला निवासासाठी बांधणेत आलेला आहे.

त्याचप्रमाणे संस्थानचे उपरोक्त अधिकाऱ्यांकरीता १७५० ते २००० चौ.फुट क्षेत्रफळाचे निवासस्थाने बांधता येतील त्यासाठी रु.१५००/- प्रती चौ.फुट याप्रमाणे अंदाजे रु.३.० कोटी मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरहू बंगल्याचे बांधकाम संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७, १०८ व १०९ पै. मधील जागेत (सध्याचे रोज गार्डन) करता येईल महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-१६०९/२७७७/प्र.क्र.३४६/०९/नवि-९ दि.०८/०७/२०१० अन्वये धर्मदाय नोंदणीकृत संस्थांच्या धर्मशाळा/ भक्तनिवास इमारतींना अतिरिक्त ०.५० चटई क्षेत्र निर्देशांक प्रदान करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर बंगल्यांचे बांधकाम करणेसाठी सदरहू शासन निर्णयानुसार नमूद शासकीय विभाग व शिर्डी नगरपंचायत यांचेकडून बांधकाम परवानगी घेणेबाबत कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / मत :-** मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पैकी मधील जागेमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निवास व्यवस्थेसाठी बंगल्यांचे बांधकाम करता येईल. तसेच या बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेकडून बांधकामासाठी आराखडे अंदाजपत्रके तयार करुन घेता येईल असे मत आहे.

तरी सदरहू प्रस्तावास मान्यतेस्तव मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी उपलब्ध असलेल्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१६ श्री साईबाबा संस्थानकडे नियुक्ती असलेल्या उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासव्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** २१(१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१, च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल:-

झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे; अशी तरतूद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल कलम १३ (४) नुसार संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमाने तिचे कर्तव्ये व काम पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणुक करता येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव:-** मा. कार्यकारी अधिकारी यांचे व्यतिरिक्त संस्थानकडे उपकार्यकारी अधिकारी यांची नियुक्त करणेत आलेली आहेत. सध्या त्यांना निवासव्यवस्थेकामी ९७०.०० चौ.फुट क्षेत्रफळाचे फ्लॅट उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासस्थानांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यापुर्वी मा. कार्यकारी अधिकारी यांचेसाठी संस्थानचे सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पैकी मधील जागेत २०२० चौ.फुट क्षेत्रफळाचा बंगला निवासासाठी बांधणेत आलेला आहे.त्याचप्रमाणे उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेस हरकत नाही. अशी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत समक्ष चर्चा झाली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



महाराष्ट्र शासनाचे, सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय क्र. शानिवा-१५०९/प्र.क्र.३२०/०९/२३-अ, दि.१९/०४/२०११ अन्वये गट अ श्रेणीतील अधिकाऱ्यांकरीता १७५० चौ.फुट क्षेत्रफळाचे शासकीय निवासस्थाने अनुज्ञेय ठरविण्याचा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता २००० चौ.फुट क्षेत्रफळाचे निवासस्थाने बांधता येतील त्यासाठी रु.१५००/- प्रती चौ.फुट याप्रमाणे अंदाजे रु.३० लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरहू बंगल्याचे बांधकाम संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७, १०८ व १०९ पै. मधील जागेत (सध्याचे रोज गार्डन) करता येईल महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-१६०९/२७७७/प्र.क्र.३४६/०९/नवि-९ दि.०८/०७/२०१० अन्वये धर्मदाय नोंदणीकृत संस्थांच्या धर्मशाळा/ भक्तनिवास इमारतींना अतिरिक्त ०.५० चटई क्षेत्र निर्देशांक प्रदान करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर बंगल्यांचे बांधकाम करणेसाठी सदरहू शासन निर्णयानुसार नमूद शासकीय विभाग व शिर्डी नगरपंचायत यांचेकडून बांधकाम परवानगी घेणेबाबत कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पैकी मधील जागेमध्ये उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवास व्यवस्थेसाठी बंगल्यांचे बांधकाम करता येईल. तसेच या बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेकडून बांधकामासाठी आराखडे अंदाजपत्रके तयार करुन घेता येईल असे मत आहे.

तरी सदरहू प्रस्तावास मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी उपलब्ध असलेल्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१७ साई धर्मशाळा आर-ब्लॉक इमारतीमध्ये अधिक्षक यांचेकरीता ॲल्यु. कॅबीन व कार्यालयीन कामकाजाकरीता ॲल्यु. पार्टीशन तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये *च्मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल व्यवस्थापन व प्रशासनछ* करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयूक्त विद्यमाने साईधर्मशाळा या भक्तनिवास प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि. १८/०७/२०१३ पासून साई धर्मशाळा हा प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करणेत आलेला आहे. आर ब्लॉक बुकींग काऊंटरच्या मागील बाजूस साई धर्मशाळा विभागाचे कार्यालय सुरु करण्यात आले आहे. सदर कार्यालयाची लांबी ५० फुट असून रुंदी १५ फुट आहे. कार्यालयीन कामाकाजाच्या दृष्टीने कार्यालयामध्ये केबीन आणि पार्टीशन बनवून देणेसाठी इकडील विभागास दि. १५/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये साईधर्मशाळा अधिक्षक यांनी कळविले आहे.

**प्रस्ताव :-**सदरचे ठिकाणी ॲल्यु. केबीन व ॲल्यु.पार्टीशन करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No. | Description | Qyu / unit | Approve Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Providing & Fixing in Position Colour Coated Alluminium Partition, Partly Glazed partly laminated. | 21.68 m2 | 2,137.00 | 46,330.00 |
| 02. | Alluminium (Power coated) Single Shutter Door. | 04.32 m2 | 3,370.00 | 14,558.40 |
| | | | **Total Amount :** | **60,888.40** |

सदरचे कामासाठी उपरोक्त तपशिलाप्रमाणे रु. ६०,८८८.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून सदर काम पूर्ण करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / मत :-** तरी याकामी येणारा खर्च रु. ६०,८८८.०० मात्रचे खर्चास व सदर काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा आर-ब्लॉक इमारतीमध्ये अधिक्षक यांचेकरीता ॲल्युमिनीयम कॅबीन व कार्यालयीन कामकाजाकरीता ॲल्युमिनीयम पार्टीशन तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६०,८८८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१८ समाधी मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी एम.एस.स्ट्रक्चर वापरुन पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ मधील तरतूद :-** "२१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम,१९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे ;

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-** उपरोक्त ठिकाणी एम.एस. स्ट्रक्चर उभारणी करुन पी.व्ही. सी. फॅब्रिक वापरुन कायमस्वरुपी छताची उभारणी करणेकामीचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे दि.२१ जून २०१३ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.४४२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.क्र.१ चे " समाधी मंदिर उत्तर बाजुकडील" छत उभारणीचे काम श्री. राजीव मेहता, नवि दिल्ली हे देणगी दाखल करणार होते. याबाबत त्यांना विचारणा केली तथापी त्यांचेकडून प्रतिसाद नसल्याने समाधी मंदिर परिसरात प्रस्तावात नमूद केलेल्या ठिकाणी एम.एस.स्ट्रक्चर वापरून, रिमुव्हेबल करुन ते नंतर इतर ठिकाणी वापरता येईल अशा प्रकारचे तयार करण्यात यावे. यासाठी पी.व्ही.सी.फॅब्रिकचे मंडप उभारणेकामी साईआश्रम प्रकल्पासाठी स्ट्रक्चरल डिझाईन सेवा दिलेले कन्सल्टंट श्री. आर.आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून स्ट्रक्चरल डिझाईन घेऊन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले."

**प्रस्तावना :-** वर नमूद व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे जा.नं.३२७८, दि.२१/१०/२०१३ रोजीचे पत्राव्दारे श्री.आर.आर.कुलकर्णी, पुणे यांची सदर कामासाठी स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्यानुसार श्री.आर.आर.कुलकर्णी, पुणे यांनी शिर्डी येथिल मंदिर परिसराची समक्ष पहाणी करुन दि.२७/११/२०१३ चे ई-पत्राव्दारे एकूण आठ शेडस्चे स्ट्रक्चरल डिझाईन व एस्टीमेट सादर केले आहे.

मूळ प्रस्तावात मंदिर परिसरातील सहा ठिकाणी एकूण १६६९६ चौ.फुट क्षेत्रामध्ये शेडस् उभारणे प्रस्तावित करणेत आले होते. त्यानंतर मा. कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार मंदिर परिसराचे पूर्वेकडील १६ R जागेतही शेड उभारणेचा समावेश करणेत आला आहे. त्यानुसार आता एकूण ३०९०३ चौ.फुट क्षेत्रामध्ये शेडस् उभारणेसाठी श्री.आर.आर. कुलकर्णी यांनी सादर केलेल्या एस्टीमेटनुसार अंदाजे रु.१,४६,१८,१२०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव :-** सदरहू प्रकल्प हा मोठ्या खर्चाचा असल्याने यासाठी येणारे खर्चास प्रथम मा.त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणे आवश्यक आहे.

तरी वरील विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु. १,४६,१८,१२०/- मात्रचे खर्चास, तसेच त्यासाठी परवानगी मिळणेकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९५० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१९** **श्री साईनाथ रुग्णालय सेवेस ५० वर्ष पुर्ण होत असलेबाबत सुवर्ण जयंती उत्सव साजरा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक १४/०५/२०१४ रोजी श्री साईनाथ रुग्णालयास रुग्ण सेवेची ५० वर्ष पुर्ण होत आहेत. त्या निमित्त श्री साईनाथ रुग्णालयाची सुवर्ण जयंती साजरी करण्याचे नियोजित आहे. श्री साईनाथ रुग्णालय सन १९६४ मध्ये सुरु करण्यात आले असून, सदर रुग्णालय हे साईबाबांचे कार्याचा एक भाग म्हणून समाजातील तळा - गाळातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने सुरु करण्यात आलेले आहे. या रुग्णालयात रुग्णांच्या सोईसाठी उत्कृष्ट प्रतीचे साहित्य व अद्ययावत मशिनरी वापरात आहेत. या रुग्णालयात आज मितीस रुग्णांची वाढती संख्या पहाता, तसेच रुग्णसेवा ही महत्वाची मानून आवश्यकतेनुसार इमारत व जागेत वाढ करणेत आलेली आहे. हे रुग्णालय चॅरिटेबल असल्याने येथे येणा-या प्रत्येक रुग्णास अल्प दरात उपचार दिले जातात. तसेच मुंबई हायकोर्टचे आदेशानुसार गरीब / दुर्बल घटकातील रुग्णांना विशेष सवलत देऊन उपचार दिले जातात.

श्री साईनाथ रुग्णालय हे २०० बेडचे सुसज्ज हॉस्पीटल असून, गेल्या ५० वर्षात टप्याटप्याने या रुग्णालयात सध्या खालील प्रमाणे विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

१. अतिदक्षता विभाग.
२. सुसज्ज शस्त्रक्रिया कक्ष
३. मेडिसीन विभाग.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



४. स्त्रीरोग व प्रसुती विभाग
५. अस्थीरोग विभाग - शस्त्रक्रिया व उपचार.
६. कान, नाक घसा संबंधित आजाराचे निदान, शस्त्रक्रिया व उपचार.
७. दंतरोग विभाग - आजाराचे निदान व उपचार.
८. नेत्ररोग विभाग - डोळयांच्या विविध तपासण्या, शस्त्रक्रिया व उपचार.
९. सुसज्ज प्रयोगशाळा, हिस्टोपॅथ, बायोकेमिस्ट्री इ. तपासण्या सुविधा.
१०. ई.सी.जी., डिजीटल एक्स-रे, सोनोग्राफी.
११. ॲलोपॅथी, होमिओपॅथी, आयर्वेदीक अशा विविध प्रकारे उपचार घेण्याच्या सुविधा.
१२. मोफत एच.आय.व्ही., तपासणी व सल्ला केंद्र (आय.सी.टी.सी. सेंटर मार्फत)
१३. ग्रामिण रुग्णालय, राहाता यांचे मार्फत मोफत डॉट सेंटरची सुविधा.
१४. मधुमेह निदान व मार्गदर्शन केंद्र

याशिवाय श्री साईनाथ रुग्णालयामार्फत जवळपासच्या २० खेडयांमध्ये मोफत फिरता दवाखाना, तसेच मंदिर परिसरात कायमस्वरुपी प्रथमोपचार केंद्र चालविले जाते.

अशा या रुग्णसेवेचा ५० वर्षे हा महत्त्वाचा टप्पा असून, त्यानिमित्ताने -

गेल्या ५० वर्षात ज्या डॉक्टर, कर्मचा-यांनी रुग्णालयास आपली सेवा दिली त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करुन, रुग्णालयाने आतापर्यंत केलेली प्रगती तसेच संस्थानने नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालय सेवा सुरु करण्यापर्यंत घेतलेली झेप समाजासमोर आणणे, त्यानिमित्ताने दोन्ही रुग्णालयातील कर्मचा-यांचे स्नेह संमेलन आयोजित करणे, त्यास सर्वच माजी कर्मचा-यांना सस्नेह आमंत्रीत करणे, इ. उदिष्टे समोर ठेऊन, हा सोहळा आयोजित करण्याचे प्रयोजन आहे. यामुळे कर्मचा-यांचे मनोबल उंचावण्यास तसेच संस्थानच्या या आरोग्य सेवेबाबत समाजात चांगला संदेश जाऊन संस्थानच्या नाव लौकिकात वाढ होईल, असे मत आहे.

सदर कार्यक्रमासाठी खालील प्रमाणे ढोबळमानाने प्राथमिक नियोजन करावे लागेल.

०१. सदर कार्यक्रमाची तारीख, वेळ व जागा निश्चीत करावी लागेल.
०२. सदर कार्यक्रम आयोजित करावयाचा असलेबाबत वर्तमान पत्रात प्रसिध्दी देऊन, ज्या - ज्या माजी कर्मचा-यांकडे तसेच इतर सजग नागरीकांकडे गेल्या ५० वर्षातील रुग्णालयाची छायाचित्रे, रुग्णालयात आयोजित केलेले विविध कार्यक्रमाचे फोटो तसेच इतरही रुग्णालयासंबंधित अनुशंगीक वर्तमान पत्रांची कात्रणे व माहिती उपलब्ध असल्यास ती नियोजन समितीकडे सुपुर्द करणेबाबत आवाहन करावे लागेल.
०३. संस्थानच्या वेबसाईटवर सदर कार्यक्रमाची लिंक देऊन त्यावर श्री साईनाथ रुग्णालयाबाबतचे ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याचे आवाहन करता येईल.
०४. गेल्या ५० वर्षातील रुग्णालय आस्थापनेवरील माजी/ आजी कर्मचा-यांची कामगार विभागामार्फत यादी व संपर्क साठीचे पत्ते तयार करावे लागतील.
०५. गेल्या ५० वर्षातील अभिलेख कक्षाकडील रुग्णालयासंबंधीचा महत्वाच्या दस्तऐवज तपासावा लागेल.
०६. सदर सोहळयास सर्व माजी विश्वस्त, सर्व माजी कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व सर्व माजी कर्मचारी यांना आमंत्रीत करता येईल.
०७. आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महाराष्ट्रातील सुप्रसिध्द व्यक्तीस प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रीत करता येईल.
०८. सदर कार्यक्रमास महाराष्ट्रातील सुप्रसिध्द समाजसेवी डॉक्टरांचा उदा. डॉ. प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग, डॉ. विकास आमटे, डॉ. हिंमतराव बावस्कर, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. संजय ओक इ. सत्कार सोहळा आयोजित केल्यास समारंभाची उंची वाढविता येईल.
०९. सदर कार्यक्रमानिमित्त स्मरणीका प्रकाशित करता येईल.
१०. सदर कार्यक्रमासाठी Audio Visual Documentary तयार करुन, तिचे सदर कार्यक्रमात प्रदर्शन करता येईल. त्यामाध्यमातुन सर्व विश्वस्त, अधिकारी, कर्मचारी यांचे थोडक्यात रुग्णालयासंबंधीत मनोगत/ आठवणींना उजाळा देता येईल.
११. सर्व माजी बाहेरगावच्या कर्मचा-यांसाठी संमेलन कालावधीत संमेलन कालावधीत निवासाची व दर्शनाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करावी लागेल.
१२. सदर कार्यक्रमा आधी सर्वांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.
१३. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व माजी कर्मचा-यांना स्मृतीचिन्ह भेट देता येईल.
१४. सर्व निमंत्रीत / आमंत्रीतांना आवश्यकतेनुसार नाष्टा भोजनाची व्यवस्था करावी लागेल.
१५. सदर सुवर्ण महोत्सवी वर्षात सर्व रुग्णालयीन कर्मचा-यांना प्रोत्साहनपर काही योजना उदा. एक अतिरिक्त वेतनवाढ इ. देता येऊ शकेल.
१६. सदर सुवर्ण महोउत्सवी वर्षानिमित्त एक महिना विविध मोफत शिबीरे घेता येतील, तसेच एक महिनाभर बाह्यरुग्ण तपासणी संपुर्ण मोफत करता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त प्रमाणे कार्यक्रम आयोजन करुन, श्री साईबाबा संस्थान मार्फत राबविण्यात येणा-या आरोग्य सेवेच्या उज्वल इतिहासातून नक्कीच संस्थानचा नावलौकिकात भर पडेल, असे मत आहे.

तरी उपरोक्त बाबींवर चर्चा होऊन, कार्यक्रम आयोजनास व याकामी येणा-या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय सेवेस ५० वर्ष पुर्ण होत असलेबाबत सुवर्ण जयंती उत्सव साजरा करणेस, तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यक्रम आयोजनास व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वॉर्ड व बिलींग करीता फॉर्म व केसपेपर छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिसेविका कार्यालयाने व बिलींग विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी दि.३१.१०.२०१३ चे मागणी पत्राकान्वये फॉर्म, बुके, रजिष्टर इ.छपाई करुन मिळणेकामी मागणी केलेली आहे. तसेच दैनंदिन कामासाठी वॉर्ड मध्ये लागणारे रजिष्टर व सर्टिफिकेट बुक हे देखील संपलेले आहे. त्यामुळे त्याची छपाई करणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | तपशिल | साईज व कागद प्रकार | रिम / पॅड | अंदाजे किंमत प्रति पॅड/रिम | अंदाजे एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कंन्टयुनिएशन शीट | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ५५.०० | ११,०००.०० |
| २ | प्रिस्क्रीप्शन पॅड मोठे | १/८ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर छपाई | २०० पॅड | २५.०० | ५,०००.०० |
| ३ | ओ.पी.डी.केसपेपर रंग पांढरा | A४ साईजचे, ८०gsm जे.के. कॉपीयर पेपरवर छपाई | ५०० पॅड | ६०.०० | ३०,०००.०० |
| ४ | ओ.पी.डी.केसपेपर रंग गुलाबी | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर छपाई | १०० पॅड | ५०.०० | ५०००.०० |
| ५ | रजा अर्ज रंग हिरवा | A४ साईजचे, ७०gsm लेजर पेपरवर छपाई | ५० पॅड | ५५.०० | २७५०.०० |
| ६ | झेरॉक्स पेपर लिगल | ३४५mmx२१५mm(FS)७०GSM ९० (जे.के. कॉपीयर) लाल रंगात पॅकींग | २०० रिम | १८०.०० | ३६,०००.०० |
| ७ | ओ.पी.डी. रजिष्टर | ८ १/२" x१३ १/२" ४०० पेजेस ७० Gsm लेजर पेपर (ब्राऊन पेपर कव्हर, कॉर्नर कापड पट्टी बायडींग व नंबरींगसह) | १० नग | १६०.०० | १६००.०० |
| ८ | ओ.टी.लिस्ट बुक | १ /६ (१०० x २) ७० GSM JK कॉपीअर (डुप्लीकेट न्युज पेपर प्रिट, -नंबरिंगसह) | ५० बुक | ५०.०० | २५००.०० |
| ९ | एक्स-रे बुक | १ /६ (१०० x २) ७० GSM JK कॉपीअर (डुप्लीकेट न्युज पेपर प्रिट, नंबरिंगसह) | ५० बुक | ५०.०० | २५००.०० |
| १० | टू -डी इको रिपोर्ट पॅड | A४साईजचे,१००gsm जे.के.कॉपीअर पेपरवर दोन रंगात छपाई | २०० पॅड | ८०.०० | १६०००.०० |
| ११ | सी.टी.स्कॅन ॲण्ड एम.आर.आय. रिपोर्ट फॉर्म | A४साईजचे, १००gsm जे.के. कॉपीअर पेपरवर दोन रंगात छपाई | २०० पॅड | ८०.०० | १६०००.०० |
| १२ | डे-नाईट रिपोर्ट बुक | ८ १/२" x१३ १/२" ४०० पेजेस ७० Gsm लेजर पेपर (ब्राऊन पेपर कव्हर, कॉर्नर कापड पट्टी बायडींग व नंबरींगसह) | १५ नग | १६०.०० | २४००.०० |
| १३ | पेशंट टोटल (Cencus) रजिष्टर | ८ १/२" x१३ इ्" ४०० पेजेस ७० Gsm लेजर पेपर (ब्राऊन पेपर कव्हर, कॉर्नर कापड पट्टी बायडींग व नंबरींगसह) | १५ नग | १६०.०० | २४००.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | मेडीकल सर्टिफिकेट बुक | A४ (१०० x २) ७० GSM JK कॉपीअर (डुप्लीकेट न्युज पेपर प्रिंट, -नंबरिंगसह) | १० नग | ७०.०० | ७००.०० |
| १५ | एम.आर.आय. रजिष्टर | ८ १/२" x१३ १/२" ४०० पेजेस ७० Gsm लेजर पेपर (ब्राऊन पेपर कव्हर, कॉर्नर कापड पट्टी बायडींग व नंबरींगसह) | ०५ नग | १६०.०० | ८००.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.-** | **१,३४,६५०.००** |

उपरोक्त छपाईकामी वार्षिक (सन २०१२ - २०१३) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि. १४.०७.२०१२ निर्णय क्रमांक ५०९ अन्वये याकामी येणाऱ्या एकूण रु. १८,५७,२९२/- चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता मिळाली होती.

त्यानुसार विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.२६.०२.२०१३ चे मा.त्रिसदस्यीय समिती सभेतील निर्णय क्र. १३८ अन्वये निम्नतम दराने खालीलप्रमाणे खरेदी आदेश देण्यात आला होता.

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नांव | पत्र क्रमांक/ दिनांक | तपशिल | छपाई नग/ पॅड | वार्षिक मंजूर दर रु. | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | कंन्टयुनिएशन शीट | ३०० पॅड | ३८.०० | ११४००.०० |
| २ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | प्रिस्क्रीप्शन पॅड मोठे | ६०० पॅड | १५.६६ | ९३९६.०० |
| ३ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | ओ.पी.डी.केसपेपर रंग पांढरा | १००० पॅड | ३८.०० | ३८०००.०० |
| ४ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | ओ.पी.डी.केसपेपर रंग गुलाबी | २५ पॅड | ४०.०० | १०००.०० |
| ५ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | रजा अर्ज रंग हिरवा | ५० पॅड | ४६.०० | २३००.०० |
| ६ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | ओ.टी. लिस्ट बुक | ५० बुक | २९.०० | १४५०.०० |
| ७ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | एक्स-रे बुक | ३० बुक | ३४.८३ | १०४४.९० |
| ८ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ९५९६/ २८.०३.२०१३ | एम.आर.आय. रजिष्टर | ०२ नग | १७०.०० | ३४०.०० |
| ९ | मे. साई एजन्सी, श्रीरामपूर | ९६००/ २८.०३.२०१३ | झेरॉक्स पेपर लिगल | ३०० रिम | १७०.०० | ५१०००.०० |
| १० | मे. रोहन प्रिंटर्स, औरंगाबाद | ९५९२/ २८.०३.२०१३ | ओ.पी.डी. रजिष्टर | १० नग | ९७.०० | ९७०.०० |
| | | | | | **एकूण रक्कम रु.-** | **१,१६,९००.९०** |

उपरोक्त प्रमाणे मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव व रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद यांनी सदर मालाचा पुरवठा देखील केलेला आहे. परंतु सदर मालापैकी काही माल संपलेला आहे व काही माल संपत आलेला आहे. शिल्लक माल अंदाजे १ महिना पुरेल इतका शिल्लक आहे. त्यामुळे सदर छपाई करणे गरजेचे आहे. तसेच मे. साई एजन्सी, श्रीरामपूर यांना स्टेशनरी पुरवठयाचा आदेश देण्यात आला होता. परंतु त्यांनी एकाही आयटमचा अद्याप पर्यंत पुरवठा केलेला नाही.

त्यामुळे झेरॉक्स पेपर (लिगल साईज) स्टोअरमध्ये शिल्लक नसल्यामुळे व दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये म्हणून खरेदी करणे गरजेचे आहे. मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव व रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद यांना दि. ३१.१०.२०१३ रोजी दूरध्वनीवरुन विचारणा केली असता ते दरात वाढ झाल्यामुळे वार्षिक मंजूर दराने छपाई करुन देणेस तयार नाहीत. तसेच मे. साई एजन्सी, श्रीरामपूर यांनी आदेश दिल्यापासून एकाही मालाचा अद्याप पर्यंत पुरवठा केलेला नाही. त्यामुळे यापूर्वीच त्यांचे सुरक्षा रक्कमेतून जास्तीचा खर्च वसूल केलेला आहे.

उपरोक्त छपाई करणेकामी अंदाजे रक्कम रु. १,३४,६५०/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख चौतीस हजार सहाशे पंन्नास मात्र) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदरची सर्व छपाई हि वार्षिक सन २०१३-१४ या वर्षात मागणी केलेली आहे. सदरच्या प्रस्तावावर कार्यवाही चालू आहे. सदर छपाई उपलब्ध होणेस अंदाजे ३ ते ४ महिण्यांचा कालावधी लागू शकेल.

त्यामुळे छपाई करुन घेणे गरजेचे आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी सदरचे छपाई कामी येणाऱ्या अंदाजे रु. १,३४,६५०/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख चौतीस हजार सहाशे पंन्नास मात्र) चे खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस मान्यता असावी .

**निर्णय क्र.९५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वॉर्ड व बिलींग करीता फॉर्म व केसपेपर विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,३४,६५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१ जादा वैद्यकीय बीलाचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:-** व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- १) जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९८ दि.१६/०१/१९९९

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रस्ताविक:-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु. १०,०००/- पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे.

**मागणी :-**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ- श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेतलेले** | | | | | | | | |
| १. | कुलकर्णी सुभाष गंगाधर<br>विभाग - प्रशासन<br>हुद्दा - मदतनीस | पत्नी | ह्दयविकार | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५७१३.०० | ५७१३.०० | |
| २. | डॉ सरदार अमोल भगवंत<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | वडील<br>आई | Chronic Prostatitis with Benign Enlargement of prostate ? Ca. prostate<br>Acute glomerulonephritis (A.R.F.) | डॉ. शर्मा / डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७६७१.०० | ७११४.०० | |
| ३. | डांगे देवराम जगन्नाथ<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - डायलेसिस तंत्रज्ञ | वडील | Paralysis | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४१२३.०० | ४१२३.०० | |
| ४. | डॉ. अजितकुमार तुकाराम वाघ<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | वडील | Chronic Renal Failure | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २२७३९.०० | २२७३९.०० | |
| ५. | डॉ. सुरवसे संतोष बी<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा -ज्यु.इन्टेंसिव्हीस्ट | स्वत: | ह्दयविकार | डॉ. शर्मा / डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४८७.०० | ५४८७.०० | |
| ६. | पठारे वेणुनाथ केशव<br>विभाग - बांधकाम विभाग<br>हुद्दा - मदतनीस | स्वत: | Pain in Abdomen | डॉ. गोरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १४३३३.०० | १४३१५.०० | |
| ७. | कडु स्वाती इंद्रभान<br>विभाग - ज्यु कॉलेज<br>हुद्दा - सहा. शिक्षिका | पती | मधुमेह | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १६४५५.०० | १६४५५.०० | |
| ८. | रंजना प्रकाश मखाना<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - आया | पती | Chronic Renal Failure | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २३८५४.०० | २३७५५.०० | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | संगिता संजय थोरात<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - सिस्टर इन्चार्ज | सासु / मुलगा | Asthama Heart Disease | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ११६८८.०० | ११६७७.०० | |
| १०. | संजय एम. पटनी<br>विभाग -संरक्षण<br>हुद्दा - आंरक्षण | स्वतः | मधुमेह | डॉ. वर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४६६३.०० | ४६६३.०० | |
| ११. | गोंदकर प्रशांत बी<br>विभाग - नविन भक्त निवासस्थान<br>हुद्दा - मदतनीस | स्वतः | जनरल | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८७८.०० | ८७८.०० | |
| १२. | नळे सुनिल नानासाहेब<br>विभाग - संरक्षण<br>हुद्दा - मदतनीस | वडील | Rt. Thalamic Bleed | डॉ. गगन शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४५२६.०० | ४५२६.०० | |
| १३. | अनिल ए. पवार<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा -सी.टी.स्कॅन टेक्निशियन | स्वतः | Pain in Abdomen | डॉ गोरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४५८.०० | ४५८.०० | |
| १४ | नाजीरे वाल्मीक दगडु<br>विभाग -संरक्षण<br>हुद्दा - पहारेकरी | वडील | ह्रदयविकार | डॉ. गगन शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३७९८.०० | १३७३३.०० | |
| १५. | दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग - द्वारावती निवासस्थान<br>हुद्दा - लिपिक | आई | ह्रदयविकार | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २१६०.०० | २१६०.०० | |
| १६. | गवळी किशोर साहेबराव<br>विभाग - माहिती तंत्रज्ञान<br>हुद्दा - ज्यु.मॅनेजर ई.डी.पी | पत्नी | जनरल | डॉ. प्रफुल्ल पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ११३६.०० | ११३६.०० | |
| १७. | सुर्वे वैशाली वसंतराव<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | आई | ह्रदयविकार | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ११२८५.०० | ११२८५.०० | |
| १८. | सुचिता राजीव मुठाळ<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - सि.इन्चार्ज | सासु / सासरे / पती | मधुमेह / ह्रदयविकार | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४०३०.०० | ४०३०.०० | |
| | | | | | एकुण रक्कम रु. | १५४९९७.०० | १५४२४७.०० | |
| **ब - संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | | |
| १. | कराडे वैशाली मिलींद<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - सिस्टर इन्चार्ज | स्वतः | Rt. Thalamic SOL for S.T. Bx | डॉ. म्हात्रे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | २५५६५.०० | २५००५.०० | |
| २. | डांगे विलास सोपान<br>विभाग - संरक्षण<br>हुद्दा - वाचमन | स्वतः | Ca-check with TMF | डॉ. कुलकर्णी | Tata Memorial Centre | १०२५०५.०० | १००७३४.०० | |
| ३. | थोरात भाऊसाहेब दगडु<br>विभाग - साईभक्त निवासस्थान<br>हुद्दा - मदतनीस | स्वतः | Tumour at Cervical Sipne | डॉ. टिंगरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १२०००.०० | १२०००.०० | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | शेळके अशोक हरीभाऊ<br>विभाग- बांधकाम<br>हुद्दा - मदतनीस | स्वत: | R- Puj Stone | डॉ. आर. आर पटनी | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १४०००.०० | १४०००.०० | |
| ५. | लुटे चंद्रकांत धोंडीराम<br>विभाग - रक्तपेढी<br>हुद्दा - तंत्रज्ञ | वडील | ? Ca. of Prostate | डॉ. मुंदडा | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी | २१८००.०० | २१८००.०० | |
| ६. | रोहिणी अरुण आडेप<br>विभाग - इंग्लिश मेडीयम स्कुल<br>हुद्दा - शिक्षिका | स्वत: | Tumor of Breast | डॉ. रामनाईक | Tata Memorial Centre | ६८९०.०० | ६८९०.०० | |
| ७. | पठाण नसरुल्ला नुरखा<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - लिपीक | पत्नी | TBD | डॉ. शर्मा / डॉ. टिंगरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ५१३८.०० | ५१३८.०० | |
| ८. | नवले रविंद्र बाळासाहेब<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - एच.आर.मॅनेजर | स्वत: | IHD | डॉ. बजाज | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ५०००.०० | ५०००.०० | |
| ९. | बकरे दिलीप गंगाधर<br>विभाग - खरेदी<br>हुद्दा - वरिष्ठ लिपीक | स्वत: | CUAAC | डॉ. मेहेरोत्रा | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ८४१६४.४५ | ७६११४.०० | |
| १०. | ब्राम्हणे भाऊसाहेब चौव्हान<br>विभाग - आरोग्य<br>हुद्दा - सफाई कामगार | स्वत: | Pulmonary Thromboembolism | डॉ. साबळे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ३५७४३.०० | ३२३४३.०० | |
| | | | | | एकुण रक्कम रु | ३१२८०५.४५ | २९९०२४.०० | |
| **क- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | | | |
| १. | तांबे संजय जयवंत<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | मुलगी | CHO (PDA) | डॉ. बजाज | Narayana Hrudayakar Hospital, Bangalore | २०८४०.०० | १६१०५.०० | |
| २. | भोसले उषा रावसाहेब<br>विभाग - संरक्षण विभाग<br>हुद्दा - पहारेकरी | आई | LE Comp Conualopary | डॉ. सोनटक्के | L.V. Prased Eye Institute | २७४२२.०० | २१९३८.०० | |
| | | | | | **एकूण रक्कम रु-** | ४८२६२.०० | ३८०४३.०० | |
| **ड- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | | | |
| | **एकुण रक्कम अ + ब + क =** | | | | | ५१६०६४.४५ | ४९१३१४.०० | |

**संस्थान अधिनियम / ठराव त्यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रीक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु.४,९१,३१४/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** नियमावली प्रमाणे छाननी केली असून मा. व्यवस्थापन समितीचे पुर्व मान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही असे मत आहे.

**निर्णय क्र.९५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ, ब व क मधील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची देय असलेली रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२ Inj. Immunoglobin Rabbies चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात दि.२७/०९/२०१३ रोजी श्री. गोधाडे भास्कर चंद्रभान मु. पो. पाथरे ता. सिन्नर वय वर्ष ४५ हा रुग्ण बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी दाखल झाला होता. सदर रुग्ण तपासल्यानंतर सदर रुग्णास काही दिवसांपूर्वी पिसाळलेले कुत्रे चावलेले आहे व त्यास उपचार न घेतल्यामुळे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(Hydrophobia) पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे सर्व कृती करणे असे लक्षण दिसून आलेले आहे, त्यामुळे सदर रुग्णास उपचार करताना ज्या ज्या कर्मचाऱ्यांचा बाह्यरुग्ण व GICU विभागात संपर्क आलेला आहे त्या एकूण ७ कर्मचाऱ्यांना सदरील प्रतीबंधात्मक लस विशिष्ट कालावधीत तातडीने देणे गरजेचे होते. सदर ७ कर्मचाऱ्यांची नावे खालील प्रमाणे -

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डॉ. मनोरंजन सिंग (RMO) | ५ | सिस्टर सविता गोले |
| २ | ब्रदर विलास जोंधळे | ६ | सिस्टर ज्योती येवले |
| ३ | ब्रदर प्रमोद वाणी | ७ | श्री. भिमराज भडांगे |
| ४ | ब्रदर विशाल पाटील | | |

त्यामुळे सदर Inj. Immunoglobin Rabbies एकूण १४ Amp खरेदी केलेले आहे. सदरचे इंजेक्शन M/s. Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik यांचेकडून बिल नं. १५६० दि. २८/०९/२०१३ अन्वये खरेदी करुन देण्यात आले सदर Inj. Immunoglobin Rabbies साठी रु. ११००००/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी:-** सदर Inj. Immunoglobin Rabbies करीता वार्षीक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. कारण Inj. Immunoglobin Rabbies हे फार क्वचित प्रसंगीच लागतात. डॉ. इंगळे (फिजिशियन) यांनी दि.२८/०९/२०१३ रोजी सदर Inj. Immunoglobin Rabbies वरील ७ कर्मचाऱ्यांना देणे बाबत सूचविले होते, त्यानुसार कॅज्युअल्टी विभागाने दि.२८/०९/२०१३ रोजी Inj. Immunoglobin Rabbies ची मागणी केली होती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-**

०१. सदर सर्व कर्मचारी हे ड्यूटीच्या वेळेत कार्यरत होते व सदर कर्मचाऱ्यांना प्रतीबंधात्मक उपाय म्हणून विशिष्ट कालावधीत लस देणे अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे सदर इंजेक्शन तातडीने खरेदी करुन सर्व रुग्णांना दिलेले आहे.

०२. तरी M/s. Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त Inj. Immunoglobin Rabbies चे बीलाची रक्कम रु.१,१०,०००/- त्यांना अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३ Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची दि.२६/०५/२०१३ अन्वये मागणी केली होती. त्यानुसार M/s. Bhalani Biomedicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बील क्र.NSK/१२६ दि.२७/०५/२०१३ (डिलेव्हरी चलन नं. ५५८०० दि.२६/०५/२०१३) अन्वये एक नग रु.१,१०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२६/०५/२०१३ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर Stent बसविणेसाठी श्री. जैन प्रविण हेमचंद यांना रु.१,५३,२४७/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री. जैन प्रविण हेमचंद या पेशंटला दि.२६/०५/२०१३ रोजी Medtronic Co. चा Resolute Integrity DES हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग Stent वापरलेला आहे.

सदर Stent करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. कारण वार्षीकमध्ये सदर Stent साठी मागणी नव्हती शिवाय असा Stent हा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



क्वचित प्रसंगी लागतो. डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची दि. २६/०५/२०१३ चे पत्रान्वये मागणी केली होती.

सदर रुग्णाची यापूर्वी Angiography मध्य प्रदेशात झालेली होती परंतु सदर रुग्णास पुन्हा त्रास होऊ लागल्याने तो संस्थानच्या रुग्णालयात दाखल झाला होता डॉक्टरांनी पूर्ण तपासणी केल्यानंतर सदर रुग्णास यापूर्वी LAD च्या ठिकाणी Stent टाकलेला होता व त्याच ठिकाणी पुन्हा Stent टाकावयाचा होता त्यामुळे सदरची शस्त्रक्रिया हि गुंतागंतीची होती अशा परिस्थितीत चांगल्या दर्जाचा Stent टाकणे गरजेचे होते असे डॉ. वर्मा यांचे म्हणणे होते त्यानुसार वैद्यकिय संचालक यांचे पूर्व परवानगीने सदर Stent वापरलेला आहे

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

०१. अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

०२. सदर Stent खरेदीकामी व रुग्णालयातील खर्चाची संपुर्ण रक्कम रु. १,५३,२४७/- ही रुग्णांने संस्थानमध्ये पावती नं. २१०६७७१२ अन्वये रोख भरलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Bhalani Biomedicals Pvt. Ltd., Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त Stent चे बीलाची रक्कम रु.१,१०,०००/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४ श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डकरीता Non Stress Test Machine with Probe खरेदीबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद:- १७-२ (ण)**

**प्रस्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डमध्ये अत्यवस्थ रुग्णांकरीता त्यांनी दि.०३/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Non Stress Test Machine with Probe एक नगाची मागणी केलेली आहे. कारण सध्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारचे मशिन उपलब्ध नाही. सदर मशिनचा उपयोग गर्भवती महिलांमध्ये त्यांची Stress Test (हृदयाचे काम व्यवस्थित चालु आहे किंवा नाही हे पहाणे) ची तपासणी करणेसाठी होतो त्यामुळे उपचार व प्रसुती व्यवस्थित करणे सोईचे होते. विशेषत: High Risk Obsteric patient साठी याचा जास्त फायदा होईल. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| १. | Non Stress Test Machine with Probe (NST Machine) with all Standard Accessories | ०१ No. |

वरील प्रमाणे Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार वरीलप्रमाणे मशिन खरेदीकामी अंदाजे १,२३,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी :-** श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्ड विभाग यांचे दि.०३/०८/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.०३/१०/२०१३) चे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** गायनिक वॉर्ड विभागात उपचारासाठी येणाऱ्या गर्भवती महिलांसाठी, ज्यांची प्रसुती हि जास्त जोखमीची असते अशा रुग्णांवर उपचार करणेसाठी सदर Non Stress Test Machine with Probe ची आवश्यकता आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,२३,७५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डकरीता आवश्यक असलेला Non Stress Test Machine with Probe विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,२३,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.२५** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.नं.०२ करीता Epoxy Flooring व Coving चे कामास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ मधील Epoxy Flooring सध्या निघालेले आहे. कारण सदर Epoxy Flooring हे २०११-१२ या वर्षी केले होते. सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ मध्ये शस्त्रक्रियेच्या कामामुळे ते साधारणत: ३ ते ४ वर्षात खराब होऊन जाते. त्यामुळे त्यात पाणी जाऊन शस्त्रक्रिया गृहात जंतु संसर्ग निर्माण होण्याची शक्यता असते. पर्यायाने याचा त्रास रुग्णांना लवकर बरे न होण्यास (Recover) होतो त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ विभागाने दि.३०/०४/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२०/०६/२०१३) चे मागणी पत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे.

त्यानुसार ऑपरेशन थिएटर विभागाने दिलेल्या मोजमापानुसार अंदाजे खर्चासाठी M/s. Al-med Equipments, Mumbai यांचेकडुन दुरध्वनीद्वारे दरपत्रक मागविले होते. त्यानुसार त्यांनी दि.२९/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये ((औषध भांडार ई-मेल प्राप्त दि.०३/१०/२०१३) खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | विभागाचे नाव | साईज | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ | ३१३.५ sq. ft. | १२०.२४ / sqft. | ३७६९५.२४ |

**मागणी:-** सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ विभागाने दि.३०/०४/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२०/०६/२०१३) चे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी वरीलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी. नं.२ मधील Sterilization (निर्जंतुकीकरण) करीता Epoxy Flooring Coving चे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या पुर्णांकीत रक्कम रु. ३७,६९५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.नं.०२ करीता Epoxy Flooring व Coving चे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३७,६९५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळया मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९,५८,२४०.६० इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९,५८,२४१/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७ तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (माहे- एप्रिल-२०१३)**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे,

२) मा. त्रिसदरस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णंसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल पुणे येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे / केमिकल / सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. १८,३७५/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- एप्रिल मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.१८,३७५ /- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणी :-**

| Sr. No | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. | Requirement |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Rohit Entrtprises, Pune | 11965 | 30/04/2013 | 18375.00 | Causalty |
| | | | **Total Amt. in Rs.** | **18,375.00** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात. त्यानूसार सदर खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८ AB Scan मशिनचा A-Scan प्रोब खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयामधील ऑप्थॅल्मीक विभागाकरीता इकडील पुरवठा आदेश क्र. ३७०२ दि. १५/०३/२००६ अन्वये मे. लाईफ साईट सर्जिकल प्रा. ली. अहमदाबाद यांचेकडुन Quantel Medical France या कंपनीचे AB Scan मशिन (Model-Compact II) रु. एकुण रु. १०,३२,०००/-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन करीता दिलेला एक वर्षांचा वॉरंटी कालावधी संपला असुन सध्या मशिनची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे.

सध्या वरील मशिनचा A-Scan प्रोब व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र दि. ३१/०७/२०१३ अन्वये कळविले आहे. त्यानुसार प्रोबची तपासणी केली असता सदर प्रोब येथे दुरूस्त होत नसल्यामुळे दुरूस्तीसाठी इकडिल पत्र क्र. १०६५/१३, दि. ०५/०८/२०१३ अन्वये M/s. Quantel Medical, France यांचे अधिकृत डिलर M/s. Technovision India Pvt. Ltd. Mumbai यांचेकडे पाठविणेत आला आहे. त्यानुसार कंपनीने प्रोबची तपासणी करून सदर प्रोब दुरूस्त होत नसल्यामुळे नवीन प्रोब खरेदी करणे करीता कळविले आहे. त्यासाठी कंपनीचे पत्र ई मेल- दि. २७/९/२०१३ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ९५,९९१/- (अक्षरी रु. पंच्यावन्न हजार नउशे एक्यान्नव मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. उपरोक्त प्रोब करीता कंपनी एक वर्षाची वॉरंटी देत आहे. सदर AB Scan मशिनचे स्पेअर पार्ट करीता M/s. Technovision India Pvt. Ltd. Mumbai, हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

तरी M/s. Technovision India Pvt. Ltd. Mumbai, यांचेकडुन AB Scan मशिनचा A Scan प्रोब खरेदी व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ९५,९९१/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झाले आहेत. सदरचे लिनन हे २००८ पासुन २०११ मध्ये जसे जसे लागेल तसे तसे खरेदी करण्यात आलेले आहे पैकी बाकी लिनन वापरुन खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/१०/२०१२ ते ३१/०३/२०१३ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक २१/०६/२०१३ निर्णय क्रमांक ४७४ अन्वये रु.३,६०,९६३/- रकमेचे लिनन नष्ट केलेले असुन, त्यानंतर दिनांक ०१/०४/२०१३ ते ३०/०९/२०१३ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन जे निकामी लिनन जमा झालेले आहे, त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.२,२२,२७२/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्य परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत केलेले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३०** **डॉ.तुषार दादासाहेब गलांडे यांना त्यांचे मनोगत जाणून घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांनी यापूर्वी दि. ०३/१२/२०१२ रोजी अर्ज सादर करुन श्री साईनाथ रुग्णालयात आयुर्वेदीक पंचकर्म व क्षारसुत्र चिकित्सा विना मोबदला करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केली होती. त्यानुसार डॉ. तुषार गलांडे यांना श्री साईनाथ रुग्णालयात आयुर्वेदीक क्षारसुत्र व पंचकर्म रुग्ण विनामुल्य तपासणी करणेसाठी वेळ देणेबाबत वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचा अभिप्राय घेऊन डॉ. तुषार गलांडे यांचा दि. ०३/१२/२०१२ रोजीचा अर्ज निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ४१ नुसार डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांना त्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे योग्यवेळी सभेपुढे समक्ष बोलविण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार डॉ. तुषार गलांडे यांना जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ८३/ २०१३ दि. ०३/०४/२०१३ अन्वये त्यांचे मनोगत जाणून घेणेसाठी त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे योग्यवेळी सभेपुढे समक्ष बोलविण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

आता डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांनी दि. ०६/०६/२०१३ रोजीचे अर्जान्वये च्श्री साईनाथ रुग्णालयामध्ये आयुर्वेदीक पंचकर्म व क्षारसुत्र चिकित्सा विना मोबदला करु इच्छित आहे, त्यासाठी मी आपणाकडे विनंती अर्ज केले आहेत. माझे अर्जावर त्रिसदस्यीय समितीसमोर चर्चा होऊन मनोगत जाणून घेणेसाठी मा. व्यवस्थापन समितीने योग्य वेळी समक्ष बोलविण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. सदर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



निर्णयानंतर व्यवस्थापन समितीच्या अनेकवेळा मिटींग झाल्या आहेत. त्यामध्ये मला मनोगतासाठी बोलविण्यात आले नाही. तरी कृपया मला मनोगतासाठी लवकरात लवकर बोलवावे, ही विनंती.

आपल्या हॉस्पीटलमध्ये मुळव्याध, भगंदर या गुदगत रोगांसाठी उपचार करण्यासाठी क्षारसुत्र पध्दत उपलब्ध नाही. या पध्दतीव्दारे उपचार केल्यामुळे अशक्य व बरे न होणारे हजारो पेशंट क्षारसुत्राव्दारे बरे होणारे आहेत. तरी कृपया विनामोबदला काम करण्याची संधी द्यावी. अशी विनंती केली आहे.छ

डॉ. तुषार गलांडे यांनी दि. ०३/१२/२०१२ रोजी श्री साईनाथ रुग्णालय येथे मोफत आयुर्वेदीक पंचकर्म व क्षारसुत्र पध्दतीने रुग्ण तपासणी करणेसाठी वेळ मिळणकामी केलेल्या अर्जाबाबत वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचे दि. ११/१२/२०१२ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

१. श्री साईनाथ रुग्णालय आकृतीबंधात आयुर्वेदीक विभागाकडे आयुर्वेदीक तज्ञांची ०२ पदे दर्शविणेत आलेली असून त्यापैकी एक पद रिक्त आहे.
२. प्रामुख्याने आयुर्वेदात क्षारसुत्र ही चिकित्सा अर्श (Piles) भगंदर (Fistulla) ह्या आजारात केली जाते. साधारणतः प्राथमिक अवस्थेतील रुग्णांना औषधी चिकित्सा व पंचकर्म ह्या उपचाराने चांगला आराम मिळतो.

क्षारसुत्र व पंचकर्म आजारावर सहा महिन्यांत घेतलेल्या उपचाराचा मासिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | महिना | क्षारसुत्र उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या | पंचकर्म उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | जून, २०१२ | ०९ | ११५ |
| २ | जुलै, २०१२ | ०६ | ९० |
| ३ | ऑगस्ट, २०१२ | ०४ | १०० |
| ४ | सप्टेंबर, २०१२ | ०७ | १०४ |
| ५ | ऑक्टोबर, २०१२ | ०३ | ११० |
| ६ | नोव्हेंबर, २०१२ | ०८ | ८० |

डॉ. रामदास आव्हाड, दर गुरुवारी सरासरी २० रुग्णांवर पंचकर्म उपचार करतात. इतर दिवशी दररोज सरासरी ०१ या प्रमाणे पंचकर्म चिकित्सा केली जाते.

३. सध्या आयुर्वेदीक विभागात डॉ. संदीप ज्ञानेश्वर शेळके, वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद) हे काम पाहत आहे. तसेच सन २००१ पासून दर गुरुवारी डॉ. रामदास आव्हाड, कोपरगाव हे मानद वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद व पंचकर्मतज्ञ) म्हणून मोफत सेवा देत आहेत.
४. आयुर्वेद विभागातील दररोज बाह्यरुग्ण संख्या सरासरी ४३ इतकी असून सदर ओपीडी रुग्णांमध्ये डॉ. रामदास आव्हाड यांचे दर गुरुवारची ओपीडी वगळता इतर दिवशीची दररोजची बाह्यरुग्ण संख्या सरासरी २० इतकी आहे. सदर विभागातून अतिरिक्त वैद्यकिय अधिकारी मिळणेबाबत मागणी आलेली नाही. असा अभिप्राय वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला आहे.

तसेच वैद्यकिय संचालक यांनी दि. १४/१२/२०१२ रोजीचे टिपणीवर सध्या आपल्याकडे या पदाचे कामकाजासाठी एक पूर्णवेळ व एक व्हिजीटींग असे दोन वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहे. आयुर्वेदीक विभागाचे ओ.पी.डी. आकडेवारीवरुन असे दिसते की, सध्या या विभागासाठी नव्याने व्हिजीटींग वैद्यकिय अधिकारी नेमण्याची आवश्यकता नाही, असा अभिप्राय दिलेला होता.

तरी, उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.तुषार दादासाहेब गलांडे यांनी दि.०६.०६.२०१३ चे अर्जाव्दारे केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१** **मे.सिमेंन्स एंटरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा.लि. मुंबई या कंपनीचे नांव व पत्ता बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था विनाखंडीत राहणेकामी मे.सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा.लि.,मुंबई यांचेशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचा दिनांक ०१/०९/२०१३ ते दिनांक ३१/०८/२०१४ या एक वर्षाचे कालावधीचा दुरुस्ती देखभाल करार करण्यात आलेला आहे. मे.सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांनी त्यांचे कंपनीचे दि.१८/१०/२०१३ पासून Siemens Enterprise Communications Private Limited Mumbai. या नांवा ऐवजी Unify Enterprise Communications Private Limited Mumbai. असा बदल करण्यात आलेला आहे, असे कळविलेले आहे. सदरचे नांवात बदलाचे भारत सरकार कार्पोरेट कार्य मंत्रालय कंपनी रजिष्ट्रार कार्यालय, महाराष्ट्र मुंबई यांचे प्रमाण पत्र सादर केलेले असुन त्यांचा कार्पोरेट ओळख संख्या नंबर U३१९०८MH२००७FTC१६६९३७ असा दिलेला आहे.

तरी मे. सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचे दि.१८/१०/२०१३ चे पत्रान्वये Siemens Enterprise Communications Private Limited. १३०, पांडूरंग बुधकर मार्ग,

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दूरदर्शन टॉवरच्या समोर, वरळी, मुंबई- ४०० ०१८. या नांवा व पत्त्या ऐवजी Unify Enterprise Communications Private Limited. Hincon House, २४७ Park, Tower - B, ६०१, ६ th Floor, LBS Marg ,Vikhroli (West), Mumbai- ४०००८३. असा बदल करणेच्या तसेच या बदललेल्या नांवाने सुधारीत कार्यादेश देऊन त्यानांवाने AMC ची रक्कम आदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.९६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२ चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणचे इमारती व परीसरातील वीजपुरवठयाकरीता एकुण ०९ ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे खंडीत होणा-या वीजपुरवठयाचे पर्यायी व्यवस्थेकरीता प्रत्येक ठिकाणी विविध क्षमतेचे डिझेल जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत.

प्रत्येक ठिकाणचे सबस्टेशनमध्ये मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल बोर्ड बसविण्यात आलेले आहेत. या मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल बोर्डमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी व जनरेटरसेट असे दोन वेगवेगळे थ्री फेज सप्लाय आलेले असतात. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर जनरेटरसेट चालू करुन चेंजओव्हर स्विच फिरवून जनरेटरसेटचा सप्लाय जोडून घेतला जातो. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा आल्यानंतर चेंज ओव्हर स्विच फिरवून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा जोडून घेतला जातो व जनरेटरसेट बंद केला जातो. सततच्या वापरामुळे चेंजओव्हर स्वीच वारंवार चालू बंद केल्यामुळे कालांतराने चेंजओव्हर स्विचेस खराब होतात. चेंज ओव्हर स्विच खराब झाल्यास पुढील इमारतींचा व परीसराचा वीजपुरवठा बंद पडतो.अशा वेळेस नविन चेंजओव्हर स्विच बसवून सप्लाय चालू करुन द्यावा लागतो.

सध्या साईनगर सबस्टेशनमधील मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल बोर्ड नं.२ वरील ८०० ॲम्पीअरचा चेंजओव्हर स्विच खराब झाला असून या पॅनेल बोर्डचा सप्लाय चालू ठेवणेकरीता पॅनेल बोर्ड नं.१ मधून केबल जोडून तात्पुरता सप्लाय चालू करुन देण्यात आलेला आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय तसेच श्री समाधी मंदिर याठिकाणचा वीजपुरवठा अखंडीत चालू ठेवणे अत्यावश्यक बाब असल्याने चेंज ओव्हर स्विचेस खराब झाल्यास ते तात्काळ बदली करुन वीजपुरवठा चालू ठेवणेकरीता आपणाकडे चेंज ओव्हर स्विचेस स्पेअर नसल्याने खरेदी करावे लागणार आहेत.

खरेदी कराव्या लागणा-या चेंजओव्हर स्विचेसचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | तपशील | मागणी | दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| ०१) | On Load Change Over Switch In Sheet Steel Encloser, Company : HH ELCON, Type : CSH800 | ०१ नग | रु. ७०,०००/- | रु.०,७०,०००/- |
| ०२) | On Load Change Over Switch In Sheet Steel Encloser, Company : L & T ,Type : FGC 800, Cat No : ST 26580 | ०१ नग | रु. ७०,०००/- | रु.०,७०,०००/- |
| ०३) | On Load Change Over Switch In Sheet Steel Encloser, Company : SOCOMEC HPL PVT LTD. , A = 1000A | ०१ नग | रु.१,३५०००/- | रु. १,३५,०००/- |
| ०४) | On Load Change Over Switch In Sheet Steel Encloser, Company : L & T , Type : FG = 1000 | ०१ नग | रु. ९९,०००/- | रु. ०,९९,०००/- |
| | | **एकुण रक्कम :-** | | **रु.३,७४,०००/** |

उपरोक्तप्रमाणे चेंजओव्हर स्विचेस कोटेशन मागवून खरेदी करणेकरीता रक्कम रुपये ३,७४,०००/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. सदरील चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेकरीता येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विद्युत विभागासाठी आवश्यक असलेले चेंजओव्हर स्विचेस विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,७४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३३ तातडीची गरज असल्याने ९० क्विंटल गावरान तुप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ चे माहे ऑक्टो -१३ ते मार्च-१४ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर, चहा पावडर व कॉफी खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७२ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९.०९.२०१३ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानुसार सदर खरेदीकामी e-Tender दि.३०.०९.२०१३ ते दि.०९.१०.२०१३ चे दरम्यान Downloading करिता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले होते. सदर निविदेमधील मुळ निविदा Financial Bid दि.१८.१०.२०१३ रोजी उघडण्यात आले. त्यामध्ये गावरान तुपाकरिता २ निविदाधारक व चहा पावडर, कॉफी खरेदीकरिता १ निविदाधारकाने निविदा भरलेली होती. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने खरेदीकामी किमान तीन निविदाधारकांच्या निविदा असणे गरजेचे असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२०१३ चे सभेत गावरान तुप, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी फेर निविदा काढव्यात असा निर्णय झालेला होता.

फेर निविदा प्रक्रियेमध्ये दि.०८.११.२०१३ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो गावरान तुपाकरिता चार निविदाधारकांच्या निविदा व नमुने प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर,दिनांक | नमुना |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | १२५३०/०७.११.२०१३ | आहे.(पंचामृत ब्रॅण्ड गावरान तुप) |
| ०२. | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | १२६१३/०८.११.२०१३ | आहे.(सोनाई ब्रॅण्ड गावरान तुप) |
| ०३. | मे.अंजता राज मिल्क प्रॉडक्टस, आग्रा | १२६१४/०८.११.२०१३ | आहे.(मोहक ब्रॅण्ड गावरान तुप) |
| ०४. | मे.अरिहंत सेल्स एजन्सी, इंदौर | १२६१५/०८.११.२०१३ | आहे.(अरिहंत ब्रॅण्ड गावरान तुप) |

गावरान तुप खरेदीकामी प्राप्त चारही निविदाधारकांचे गावरान तुपाचे नमुने दि.०८.११.२०१३ रोजी सायं.०५.३० ते ०६.०० वा.चे दरम्यान अधिक्षक तथा प्र.प्रशासकीय अधिकारी खरेदी विभाग व अधिक्षक तथा प्र.प्रशासकीय अधिकारी प्रसादालय विभाग यांचे उपस्थित सिलबंद करुन, त्यास गोपनीय कोड नंबर देऊन दि.०९.११.२०१३ रोजी मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीकरिता पाठविण्यात आलेले आहेत. सदर कार्यवाहीचे ध्वनीक्षेपण विभागामार्फत चित्रीकरण करण्यात आलेले होते.

सोमवार दि.११.११.२०१३ रोजी निविदाधारकांकडून प्राप्त Technical Bid श्री.एस.व्ही.गमे व श्री.यु.पी.गोंदकर प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थित उघडण्यात आले. सदरच्या निविदेचे टेक्नीकल बीड उघडले असता, संकेतस्थळावर खालील चार निविदाधारकांच्या निविदा मुदतीत Upload झालेले होत्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई |
| ०२. | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी |
| ०३. | मे.अंजता राज मिल्क प्रॉडक्टस, आग्रा |
| ०४. | मे.अरिहंत सेल्स एजन्सी, इंदौर |

उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेतील कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात आलेली होती, ते मागणीप्रमाणे बरोबर होते. तसेच मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडील प्राप्त झालेला तपासणी अहवाल हा दि.१८.११.२०१३ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आले होते, त्यामध्ये चारही निविदाधारकांचे गावरान तुप खाण्यायोग्य असल्याचे नमुद केलेले होते.

त्यानुसार दि.१८.११.२०१३ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त निविदाधारकांना चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त चारही निविदाधारकांच्या मुळ निविदा (Financial Bid) उघडून निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आली,
त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | ब्रॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचे दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | ३३,०७५/- | ३२,५००/- |
| २ | इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | ३३,०७५/- | ३२,५००/- |
| ३ | अजता राज प्रोट्रीन्स लिमीटेड, आग्रा | मोहक | ३३,५००/- | **२९,९५०/-** |
| ४ | अरिहंत सेल्स एजसी, इंदौर | अरिहंत | ३३,३००/- | ३३,३००/- |

चर्चा वाटाघाटीमध्ये मे.अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा यांचे मोहक ब्रॅण्डचे गावरान तुपाचे दर प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्र न्युनतम आल्याने त्यांना पुढील कालावधीमध्ये ६००० क्विंटल गावरान तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील जा.क्र.३७४५/२०१३ दि.१९.११.२०१३ अन्वये मे.अजंता राज प्रोटीन्स लिमिटेड, आग्रा यांना ६००० क्विंटल गावरान तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. तसेच त्यांना दि.२२.११.२०१३ पर्यंत गावरान तुपाची पहिली गाडी पाठविणेबाबत कळविलेले होते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मात्र आज दि.२३.११.२०१३ रोजी संस्थानचे भांडार विभागात १५ क्विंटल गावरान तुप शिल्लक आहे. मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांना दुरध्वनीद्वारे गावरान तुपाचे पुरवठाबाबत विचारणा केली असता, त्यांनी दि.२३.११.२०१३ रोजी दु.०२.०० वा. गाडी आग्रा येथून निघालेली आहे. सदरची गाडी शिर्डी येथे पोहचण्यास अंदाजे ७२ तास लागतील. तसेच पहिलीच गाडी असल्याने थोडा जास्त कालावधी लागू शकतो असे कळविलेले आहे. म्हणजे मे.अंजता राज प्रोटीन्स लि, आग्रा यांचेकडून गावरान तुपाची गाडी दि.२७.११.२०१३ रोजी मिळण्याची शक्यता आहे. भांडार विभागाकडील शिल्लक गावरान तुप दि.२४.११.२०१३ अखेर पुरेल. त्यामुळे गावरान तुपाअभावी साईभक्तांना लाडूप्रसाद पुरविण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे संस्थानचे मागील पुरवठाधारक मे.पंचामृत डेअरी प्रा.लि.मुंबई यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता, त्यांनी मे.अंजता राज प्रोटीन्स लि.,आग्रा यांचे मंजुर दरामध्ये (प्रति क्विंटल रु.२९,९५०/-) ९० क्विंटल गावरान तुप तातडीने पुरविण्यास तयारी दर्शविलेली आहे. सदर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२६,९५,५००/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख पंच्यान्नव लाख पाचशे) मात्र खर्च येऊ शकतो.

साईभक्तांना लाडूप्रसाद देणेकामी अडचण निर्माण होऊ नये, याकरिता तातडीची गरज म्हणून मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून गावरान तुपाचा पुरवठा होईपावेतो सध्याचे मंजुर दरामध्ये (प्रति क्विंटल रु.२९,९५०/-) ९० क्विंटल गावरान तुप खरेदी केलेले आहे. त्याकामी येणारे रक्कम रु.२६,९५,५००/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख पंच्यान्नव लाख पाचशे) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. सदरचा खर्च सन २०१३-१४ प्रसादालय विभाग किराणा माल खरेदीचे अंदाजपत्रकातून करता येईल.

**निर्णय क्र.९६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३४** **तातडीची गरज असल्याने ९० क्विंटल गावरान तुप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ चे माहे ऑक्टो -१३ ते मार्च-१४ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, चहा पावडर व कॉफी खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७२ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९.०९.२०१३ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर खरेदीकामी e-Tender दि.३०.०९.२०१३ ते दि.०९.१०.२०१३ चे दरम्यान Downloading करिता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले होते. सदर निविदेमधील मुळ निविदा Financial Bid दि.१८.१०.२०१३ रोजी उघडण्यात आले. त्यामध्ये गावरान तुपाकरिता २ निविदाधारक व चहा पावडर, कॉफी खरेदीकरिता १ निविदाधारकाने निविदा भरलेली होती. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने खरेदीकामी किमान तीन निविदाधारकांच्या निविदा असणे गरजेचे असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२०१३ चे सभेत गावरान तुप, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी फेर निविदा काढव्यात असा निर्णय झालेला होता.

फेर निविदा प्रक्रियेमध्ये दि.०८.११.२०१३ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो गावरान तुपाकरिता चार निविदाधारकांच्या निविदा व नमुने प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे गावरान तुप खरेदीकामी प्राप्त चारही निविदाधारकांचे गावरान तुपाचे नमुने मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीकरिता पाठविण्यात आलेले आहेत.

सोमवार दि.११.११.२०१३ रोजी निविदाधारकांकडून प्राप्त Technical Bid उघडले असता, संकेतस्थळावर खालील चार निविदाधारकांच्या निविदा मुदतीत Upload झालेले होत्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई |
| ०२. | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी |
| ०३. | मे.अंजता राज मिल्क प्रॉडक्टस, आग्रा |
| ०४. | मे.अरिहंत सेल्स एजन्सी, इंदौर |

उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेतील कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात आलेली होती, ते मागणीप्रमाणे बरोबर होते. तसेच मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडील प्राप्त झालेला तपासणी अहवाल हा दि.१८.११.२०१३ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आले होते, त्यामध्ये चारही निविदाधारकांचे गावरान तुप खाण्यायोग्य असल्याचे नमुद केलेले होते. त्यानुसार दि.१८.११.२०१३ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त निविदाधारकांना चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त चारही निविदाधारकांच्या मुळ निविदा (Financial Bid) उघडून निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आली, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | ब्रॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचे दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | ३३,०७५/- | ३२,५००/- |
| २ | इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोाई | ३३,०७५/- | ३२,५००/- |
| ३ | अजता राज प्रोट्रीन्स लिमीटेड, आग्रा | मोहक | ३३,५००/- | **२९,९५०/-** |
| ४ | अरिहंत सेल्स एजसी, इंदौर | अरिहंत | ३३,३००/- | ३३,३००/- |

चर्चा वाटाघाटीमध्ये मे.अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा यांचे मोहक ब्रॅण्डचे गावरान तुपाचे दर प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्र न्युनतम आल्याने त्यांना पुढील कालावधीमध्ये ६००० क्विंटल गावरान तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील जा.क्र.३७४५/२०१३ दि.१९.११.२०१३ अन्वये मे.अजंता राज प्रोटीन्स लिमिटेड, आग्रा यांना ६००० क्विंटल गावरान तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. तसेच त्यांना दि.२२.११.२०१३ पर्यंत गावरान तुपाची पहिली गाडी पाठविणेबाबत कळविलेले होते.

मात्र त्यांचेकडून दि.२३.११.२०१३ पर्यंत गावरान तुपाचा पुरवठा न झाल्यामुळे साईभक्तांना लाडू प्रसाद देणेस अडचण निर्माण होऊ नये, याकरिता खरेदी विभागाकडील दि.२३.११.२०१३ रोजीचे टिपणीवरील मान्यतेने व मा.अध्यक्ष सो. यांचे सुचनेनुसार मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे मंजुर दरामध्ये (प्रति क्विंटल रु.२९,९५०/-) ९० क्विंटल गावरान तुप तातडीने खरेदी करण्यात आलेले आहे.

मात्र आज दि.२८.११.२०१३ रोजी सायंकाळी १८.०० वा. पर्यंत मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून गावरान तुपाचा पुरवठा झालेला नाही. सध्या संस्थानचे भांडार विभागात गावरान तुप शिल्लक नाही. तसेच मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून गावरान तुपाचा पुरवठा झाला नंतरही सदरचे तुप तपासणी करिता याचिकाकर्त्यांना द्यावे लागेल, तसेच संस्थानमार्फतही त्याची तपासणी करण्यात येईल. तपासणीचे अहवाल येण्यास साधरणत: १० ते १२ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, तोपर्यंत मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून पुरवठा झालेले गावरान तुप लाडूकरिता वापरता येणार नाही.

मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२४.११.२०१३ रोजीचे पत्रामध्ये ते सध्याचा गावरान तुपाचा मंजुर दर प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्र प्रमाणे गावरान तुप पुरविण्यास तयार असलेबाबत कळविलेले आहे.

सध्या भांडार विभागात गावरान तुपाचा साठा शिल्लक नसल्याने व मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून येणारे गावरान तुप लगेच वापरता येणार नसल्यामुळे साईभक्तांना लाडू प्रसाद सेवा पुरविण्यास अडचण येऊ नये, याकरिता मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून सध्याचे मंजुर दरामध्ये प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्रप्रमाणे ९० क्विंटल गावरान तुप खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.२६,९५,५००/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख पंच्यान्नव हजार पाचशे) मात्र खर्च येऊ शकतो.

तरी सध्या भांडार विभागात गावरान तुपाचा साठा शिल्लक नसल्याने व मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून येणारे गावरान तुप लगेच वापरता येणार नसल्यामुळे साईभक्तांना लाडू प्रसाद सेवा पुरविण्यास अडचण येऊ नये, याकरिता मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून सध्याचे मंजुर दरामध्ये प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्रप्रमाणे ९० क्विंटल गावरान तुप खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.२६,९५,५००/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख पंच्यान्नव हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. सदरचा खर्च सन २०१३-१४ प्रसादालय विभाग किराणा माल खरेदीचे अंदाजपत्रकातून करता येईल.

**निर्णय क्र.९६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३५** **सन २०१४- १५ (माहे एप्रिल-१४ ते मार्च- १५) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी किराणा माल व इतर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायाल खंडपीट औरंगाबाद यांचे आदेशानुसार माहे एप्रिल - २०१३ ते मार्च-२०१४ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी खरेदी करावयाच्या किराणा मालाची मुदत माहे मार्च-२०१४ अखेर संपत आहे. त्यामुळे पुढील वर्षा २०१४-१५ करिता (माहे एप्रिल-१४ ते मार्च-१५) अखेर खरेदी करावयाच्या किराणा मालाबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन (त्रीसदस्य) समिती पुढे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने, सबंधीत विभागांना उपरोक्त कालावधीत दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल व त्याबाबतचे खर्चाची सविस्तर मागणी सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सबंधीत विभागांनी त्यांचेकडील मागणी कळविलेली आहे. त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सन २०१४-१५ करिता (माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५) खरेदी करावयाच्या किराणा मालाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

(अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने करणेची खरेदी...

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कोपरगांव, राहाता येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथून जाहीर लिलावाने खरेदी करणेत येतो. संस्थानतर्फे साजरे होणारे उत्सव तसेच सुटयांमुळे होणारे गर्दीच्या काळात साईभक्तांची संख्या वाढल्यास नाशिक येथून भाजीपाला खरेदी करणेत येतो. सन २०१४-१५ (माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५) मध्येही कृषी उत्पन्न समितीचे कोपरगांव, राहाता इत्यादी ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार नाशिक व इतर ठिकाणाहून भाजीपाला खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रु.२,२५,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचवीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

(ब) जाहिर निविदा मागवून करावयाची खरेदी..

सन २०१४-१५ (माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५) करिता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू, हरबरा इ.धान्य तसेच तांदुळ, तूप, तेल, साखर, चहा, दूध विविध प्रकारचा किराणा माल, मसाला पदार्थ, ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी, पेपरकप, बिस्कीटे, मिनरल वॉटर इ. मालाचा तपशीलवार तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. खरेदी करावयाच्या मालाची अंदाजे मागणी दाखवितांना मागील वर्षाच्या प्रसादालय व कॅन्टीन विभागाकडील प्रत्यक्ष वापरण्यांत आलेल्या मालाची आकडेवारी दिलेली असून त्यात भक्तनिवासस्थानांमध्ये करण्यांत येणारी प्रसाद भोजन व्यवस्था, श्री साईबाबा रुग्णालय विभागात रुग्णांना देण्यात येणारे जेवण तसेच गर्दीचे कालावधीमध्ये तात्पूरत्या स्वरुपात उभारण्यांत येणारे स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष यांचाही समावेश करण्यात आलेला असल्याने मालाची २५ ते ३०% वाढ गृहीत धरलेली आहे. तसेच श्री साईभक्तांना प्रसादरुपाने अल्पदरात नाष्टा व प्रसादलाडू देण्यात येतो, त्यांचे विक्रीमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ विचारात घेऊन त्यासाठी आवश्यक असणा-या किराणा मालाची मागणी वाढविणेत आलेली आहे. जाहिर निविदा मागवून खरेदी करावयाच्या मालाचा व त्यासाठी आवश्यक खर्चाच्या रकमेचा तपशील सोबतच्या परिरशिष्टात दिला आहे. तरी परिशिष्टात नमूद केलेला किराणा माल निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.७६,५०,००,०००/- (अक्षरी रुपये शहात्तर कोटी पन्नास लाख) मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता मिळणेस विनंती.

सन २०१४-१५ (माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५) साठी वार्षिक उलाढालीबाबत खालीलप्रमाणे निकष ठरवून निविदा मागविता येतील.

| अ.नं. | तपशिल | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१. | भाजीपाला | २,२५,००,०००/- | मोंढयावरुन खरेदी |
| ०२. | गहु, हरबरा इ. | १,९९,५५,०००/- | ५०,००,०००/- |
| ०३. | साखर | ५,३४,०५,०००/- | १,३०,००,०००/- |
| ०४. | किराणामाल- दाळी, कडधान्ये व इतर | १३,४६,३९,६९०/- | ३,४०,००,०००/- |
| ०५. | तांदुळ | २,४०,९७,६००/- | ६०,००,०००/- |
| ०६. | गावरान तूप | ३५,८६,४६,०००/- | ९,००,००,०००/- |
| ०७. | खादयतेल (सुर्यफूल) | ३,८२,६६,४००/- | १,००,००,०००/- |
| ०८. | चहा व कॉफी | ५२,५६,०००/- | १३,००,०००/- |
| ०९. | गाय दुध टोण्ड | ५,४०,८४,५७०/- | १,३५,००,०००/- |
| १०. | बिस्कीटे | १,४४,००,०००/- | ३६,००,०००/- |
| ११. | पेपरकप | २,४०,६०,०००/- | ६०,००,०००/- |
| १२. | ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी | २,४८,८२,४००/- | ६२,२०,०००/- |
| १३. | मिनरल वॉटर | १,३३,०७,३४०/- | ३५,००,०००/- |

साधारणतः फेब्रवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयात वृत्तपत्रात व जाहिर सुचना प्रसिध्द करावी लागेल. जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात येईल. निविदा प्रसिध्द झालेपासून १० ते १२ दिवस निविदा भरण्याची मुदत ठेवण्यात येईल. त्यानंतर पुढील ०२ दिवसाचे आत नमुने व तांत्रिक निविदा स्विकारल्या जातील. त्यानंतर तांत्रिक निविदा उघडून त्यातील कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. तसेच गावरान तुपाचे नमुने तपासणीकामी मे.अश्वमेध लॅब, नाशिक येथे तपासणीस पाठविण्यात येतील.

तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे प्राप्त नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील. त्यानंतर मार्च महिन्याच्या दुसऱ्या/तिसऱ्या आठवडयात कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या व

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



निवडणेत आलेल्या नमुन्यांच्या निविदाधारकांच्या मुळ निविदा तसेच मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडील गावरान तुप तपासणी अहवाल मा.व्यवस्थापन समिती (त्रीसदस्य) सभेत उघडून निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेऊन मंजूर मालाचे निविदाधारकांना पुरवठा आदेश देता येईल. एप्रिल-१४ पासून नवीन मालाचा पुरवठा सुरु होईल.

तरी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस तसेच त्याकामी येणारे एकुण पुर्णांकित खर्च रु.७८,७५,००,०००/- (अक्षरी रुपये अठ्याहत्तर कोटी पंचाहत्तर लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४- १५ (माहे एप्रिल-१४ ते मार्च- १५) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी वार्षीक किराणा व इतर माल प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यपध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७८,७५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खरेदीकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर खरेदी प्रक्रिया करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३६ अन्नपाकिटे व भाजीसाठी लागणारी ४" x ६" या साईजची ग्लासिन लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक**:- श्री साई प्रसादालयामार्फत साईभक्तांना सकाळी ०७.०० ते १०.०० या वेळेत अन्नपाकीटांची अल्पदरात विक्री केली जाते. दररोज अंदाजे १०००० पाकीटे ठेकेदारा मार्फत बनविण्यात येऊन ते संस्थानच्या विविध काऊंटरवर विक्री केले जातात. सदर अन्नपाकीटामध्ये पुरी, भाजी व बर्फी देण्यात येते.

यापुर्वी पुरी, भाजी व बर्फी भरण्यासाठी प्लास्टिक पिशवीचा वापर केला जात होता. परंतू माहे जुन- २०१३ पासून प्लास्टिक पिशवी ऐवजी ग्लासिन लॅमिनेटेड पेपर पिशवी वापरणेबाबत निर्णय झालेला आहे. सन २०१३- १४ करीता वार्षिक मागणीमध्ये ३७ क्विंटल ४" x ६" या साईजची प्लास्टिक पिशवीची खरेदी विभागामार्फत मागणी करण्यात आलेली होती. परंतू पुरवठादाराकडून सदर पिशवीचा पुरवठा न झाल्याने जून व जुलै- २०१३ मध्ये ३०० किलो प्लास्टिक पिशवी स्थानिक व्यापाऱ्याकडून खरेदी करण्यात आलेली होती. प्लास्टिक पिशवी वापरणे पुर्णपणे बंद करण्यात आलेली असून त्याऐवजी ग्लासिन पेपर पिशवी ४" x ६" चा वापर होत आहे. प्लास्टिक पिशवी वजनाला हलकी असल्याने ती महिन्याला अंदाजे ०५ क्विंटल वापरली जात होती. परंतू पेपर पिशवीचे वजन जादा असल्याने सदर पिशवीचा वापर व खर्च दुप्पट म्हणजेच महिन्याला अंदाजे १० क्विंटल होत आहे. त्यानुसार खरेदी विभागामार्फत ऑक्टोबर-२०१३ अखेर ४२ क्विंटल पिशवीचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. तरी सदर पिशवी कमी पडणार असल्याने पुढील ०४ महिन्यांसाठी ४" x ६" या साईजची ग्लासिन लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदी विभागामार्फत खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी :-** प्लास्टिक पिशवीचे वजन पेपर पिशवीच्या वजनापेक्षा कमी असल्याने पेपर पिशवीचा जादा प्रमाणात वापर होत आहे. त्यामुळे वार्षिक मागणीमध्ये मागणी केलेली सदर पिशवी कमी पडणार असल्याने माहे डिसेंबर-२०१३ ते मार्च-२०१४ अखेर ५० क्विंटल वाढीव ग्लासिन लॅमिनिटेड पेपर पिशवीची गरज लागणार आहे. सदर ४"x६" या साईजच्या पेपर पिशवीचा दरपत्रकातील मान्य दर रू. १८१/- प्रति किलो नूसार ५० क्विंटल पेपर पिशवी खरेदीसाठी अंदाजे रु. ९,०५,०००/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमानः- आर्थिक**

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** तरी साईभक्तांना अल्पोपहार म्हणून पुरविणेत येणारे अन्नपाकीटे पॅकींगसाठी ४"x६" या साईजची पेपर पिशवी खरेदी करणे गरजेचे असल्याने माहे मार्च-२०१४ अखेर ५० क्विंटल पेपर पिशवी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेकामी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९,०५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.९६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना अल्पोपहार म्हणून पुरविणेत येणाऱ्या अन्नपाकिटे पॅकींगसाठी ४"x६" या साईजची ५० क्विंटल ग्लासिन लॅमिनिटेड पेपर पिशवी खरेदीकामी मागील पुरवठाधारक मंजूर दराने देणेस तयार असलेस त्यांचेकडून खरेदी करण्यात यावी, अथवा सदर कामी निविदा मागविणेत याव्यात असे ठरले.**

**तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,०५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.३७** **दिपावतली सुट्टीमध्ये गर्दीचे कालावधीत श्री साई केटरर्स, श्रीरामपुर यांचेकडून लावणेत आलेल्या प्रासंगिक (वाढपी कर्मचारी) कर्मचाऱ्यांचे बील आदा होणेकामी कार्योत्तर मान्यता मिळणेस व गर्दीचे कालावधीत प्रासंगिक कर्मचारी लावणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रास्तविक:-** श्री साईबाबा संस्थान तर्फे साजरे करण्यात येणारे तिन उत्सव, नवीन वर्षारंभ, एप्रिल-मे महिन्यातील शाळांना असलेल्या सुट्टया, तसेच दिपावली सण व नाताळ सणानिमित्त श्री साईभक्तांची श्रींचे दर्शन व प्रसादभोजन घेणेसाठी नेहमीच मोठया प्रमाणात गर्दी होत असते. गर्दीचे कालावधीत साईभक्तांना विनातक्रार, विनाविलंब प्रसादभोजनाची सुविधा मिळणे गरजेचे असते. वाढीव गर्दीमध्ये भक्तांना सेवा पुरविणेसाठी सध्याचे कर्मचारी वृंद कमी पडतात. पर्यायाने भक्तांना प्रसादभोजनासाठी सुमारे अर्धा ते दोन तास प्रतिक्षा करावी लागते. अशावेळी साईभक्तांना विनाप्रतिक्षा प्रसादभोजन पुरविता यावे म्हणून कामगार विभाग यांचेकडून प्रासंगिक कर्मचारी न मिळाल्यास स्थानिक केटरर्स यांचेकडून जादा अकुशल कामगार किमान वेतन दरानूसार लावावे लागतात.

त्यानुसार दिपावलीची सुट्टयामधील साईभक्तांची होणाऱ्या अपेक्षित गर्दीचा विचार करता, श्री साई प्रसादालय विभागाचे दि.०५/११/२०१३ चे मंजूर टिपणीनुसार बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांचेमार्फत दररोज ५० जादा कंत्राटी कर्मचारी कामगार लावणेस अथवा त्यांचेमार्फत कामगारांची पुर्तता न झालेस श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचेमार्फत जादा कर्मचारी लावणेस मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचेमार्फत दि.०६/११/२०१३ ते दि.२०/११/२०१३ या कालावधीत ७ ते ३ व ३ ते ११ या दोन शिफ्टमध्ये दररोज प्रत्येकी २५ वाढपी कर्मचारी घेणेत आलेले असून त्यांचे एकुण ७५० मॅन्डेज (दिवस) झालेले आहे.

किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ ला अनुज्ञेय असणारे कंत्राटी अकुशल कामगारांचे किमान वेतन रु.२३९.४३ पैसे निश्‍चिती करण्यात आलेले आहे. त्यानुसार एकूण ७५० दिवसांचे रु.२३९.४३ पैसे प्रती दिनीप्रमाणे रक्कम रु.१,७९,५७२.५० पुर्णांकित रु.१,७९,५७३/- (अक्षरी रु.एक लाख एकोण्यांशी हजार पाचशे त्र्याहत्तर मात्र) होते.

**मागणी :-** १) साईभक्तांची प्रसादभोजन अभावी गैरसोय होवू नये म्हणून दिपावली सणानिमित्त गर्दीचे कालावधीत श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचेमार्फत लावणेत आलेल्या (वाढपी) अकुशल कामगारांचे बिलाची रक्कम रु.१,७९,५७३/- आदा करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी,

२) तसेच येथून पुढे संस्थान उत्सव, दिपावली, नाताळ अथवा सलग सार्वजनिक सुट्टया गर्दीचे कालावधीत होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करता आवश्यकतेनुसार कामगार विभाग, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून कामगार उपलब्ध न झाल्यास स्थानिक केटरर्स यांचेकडून अकुशल कामगार घेणेस व यांना किमान वेतन अधिनियम कायद्यानूसार रक्कम आदा करणेस मंजुरी मिळणेकामी सदरील विषयाची टिपणी मा.त्रिसदस्यीय व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :-**आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** तरी साईभक्तांची प्रसादभोजन अभावी गैरसोय होवू नये म्हणून दिपावली सणानिमित्त गर्दीचे कालावधीत श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचेमार्फत लावणेत आलेल्या (वाढपी) अकुशल कामगारांचे बिलाची रक्कम रु.१,७९,५७३/- आदा करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी, तसेच श्रींचे उत्सव, दिपावली, नाताळ अथवा सलग सार्वजनिक सुट्टया गर्दीचे कालावधीत वेळोवेळी होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करता आवश्यकतेनुसार कामगार विभाग, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून कामगार लावणेस अथवा त्यांचेकडून उपलब्ध न झाल्यास स्थानिक केटरर्स यांचेकडून अकुशल कामगार घेणेस व त्यांना किमान वेतन अधिनियम कायद्यानूसार रक्कम आदा करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.३८** **एनव्हयरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांची पाणी नमुने तपासणी कामी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडिल कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परीसरामध्ये विविध ठिकाणी वितरित केले जाते. सदरचे पाणी शुध्द होऊन ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याच्या नमुन्यांची लॅबमध्ये तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची पाणी पुरवठा विभागाकडिल लॅबमध्ये अणुजीव व रासायनिक पध्दतीने तपासणी केली जाते. तसेच अहमदनगर येथील जिल्हा आरोग्य केंद्रात पाणी नमुने अणुजीव तपासणी करीता दर महिन्याला पाठविले जातात. याशिवाय एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची याकामी पाणी नमूने तपासणीसाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(रासायनिक व अणुजीव) नेमणूक करण्यात आलेली होती व त्यांचेकडून पाणी नमुने तपासणीचा दरमहा अहवाल मागविला जात आहे. व त्यांनी केलेल्या सुचना अमलात आणून पाणी शुध्दीकरणासाठी उपाय योजिले जातात.

पाणी पुरवठा विभाग दि. ०५ डिसेंबर, २०१२ रोजीचे मंजुर टिपणीन्वये एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांना दि.०१ जानेवारी, २०१३ ते दि.३१ डिसेंबर, २०१३ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेसाठी टिपणी सादर करण्यात आलेली होती. यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७ फेब्रुवारी, २०१३, विषय नं.०१ निर्णय क्रं.६१ नुसार खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

" यावर सविस्तर चर्चा होवून, एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पूर्वीचेच अटीशर्तीवर, प्रती सॅम्पल रुपये ९५० मात्र, (दरमहा ०४ सॅम्पल + रुपये २००/- मात्र व्हिजीट चार्ज) + १२.३६% सर्व्हिस टॅक्ससह दिनांक ०१ जानेवारी, २०१३ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करण्यात यावी, असे ठरले. "

त्यानुसार एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांची दि.०१ जानेवारी, २०१३ ते दि. ३१ डिसेंबर, २०१३ अखेर पूर्वीचेच अटी शर्तीवर पाणी तपासणी कामी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थानची पाणी तपासणी लॅब कार्यरत असुन, त्यामध्येही नियमित पाण्याची तपासणी करणेत येत आहे. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांचेकडुन सलग ११ वर्षापासून पाणी तपासणी करण्यात येत असून उपरोक्त कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असल्याने तसेच पाणी शुध्दीकरणांकरीता त्यांचे मार्गदर्शनाची आपणास आवश्यकता असल्याने त्यांची पुर्वीप्रमाणेच पाणी तपासणी कामी नेमणूक करण्यात यावी असे नम्र मत आहे.

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पाणी तपासणी मुदत माहे डिसेंबर, २०१३ अखेर समाप्त होत असल्याने त्यांनी पुढील कालावधी (माहे जानेवारी, २०१४ ते डिसेंबर, २०१४) करीता प्रशासनशाखा आवक नं. १३१४१, दि. १६ नोव्हेंबर, २०१३ अन्वये कोटेशन सादर केलेले असून त्यामध्ये त्यांनी प्रती शॅम्पल रुपये १०५०/- मात्र दरमहा ०४ शॅम्पल + रुपये ३००/- मात्र व्हीजीट चार्ज + १२.००% सर्व्हीस टॅक्स + E.Cess २ % + S.H. Edu. Cess १ % प्रमाणे मागणी केलेली आहे.

संस्थानचा पाणी वापरात मोठया प्रमाणावर वाढ झालेली असून, पुढील कालावधीसाठी संस्थानचे मंदिर परिसर, श्री साईबाबा हॉस्पिटल, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम), व्दारावती व धर्मशाळा, श्री साईप्रसादालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा अशा आठ ठिकाणीचे पाणी नमुन्यांची दरमहा रासायनिक व अणुजीव तपासणी करावी असे नम्र मत आहे. त्यामध्ये चार नमुने सुरुवातीचे पंधरा दिवसात तर उर्वरीत चार नमुने नंतरचे पंधरा दिवसात याप्रमाणे दरमहा ०८ नमुन्यांची तपासणी करता येईल.

तरी एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना पूर्वीचेच अटीशर्तीप्रमाणे त्यांनी कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराप्रमाणे प्रती शॅम्पल रुपये १०५०/- मात्र दरमहा ०८ शॅम्पल + रुपये ६००/- मात्र व्हीजीट चार्ज + १२.००% सर्व्हीस टॅक्स + E.Cess २ % + S.H. Edu. Cess १ % याप्रमाणे दिनांक ०१ जानेवारी, २०१४ ते दिनांक ३१ डिसेंबर,२०१४ अखेर पाणी तपासणी करणेकरीता एकुण रुपये १,२१,३५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पाणी तपासणी कामी नेमणूक करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.९७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना पूर्वीचेच अटी-शर्तीवर प्रती शॅम्पल रुपये १०५०/- मात्र (दरमहा ०८ शॅम्पल + रुपये ६००/- मात्र व्हीजीट चार्ज) + १२.००% सर्व्हीस टॅक्स + E.Cess २ % + S.H. Edu. Cess १ % याप्रमाणे दिनांक ०१ जानेवारी, २०१४ ते दिनांक ३१ डिसेंबर,२०१४ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२१,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.३९** **श्री साईआश्रम प्रकल्प भाग-०१ व साईधर्मशाळा येथील प्लंबींग कामांसाठी मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतीची उभारणी करण्यात आलेली आहे. ही निवासाची सुविधा मोठया प्रमाणावर व विनासायास उपलब्ध व्हावी म्हणून मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७,१०८,१०९ पैकी मधील क्षेत्रामध्ये तसेच शिर्डी शहरालगत असलेल्या मौजे निमगांव-कोऱ्हाळे ग्रामपंचायत हद्दीतील संस्थान मालकीच्या गट नं. १७२ पैकी मधील जमीनींमध्ये अनुक्रमे साईआश्रम प्रकल्प भाग १ व साईधर्मशाळा या निवासस्थान प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मेकॅनिकल विभागामार्फत साईआश्रम भाग १ व साई धर्मशाळा येथे टेरेसवर एकुण ८९ आर.ओ. बसविणेचे काम चालू करण्यात आलेले आहे. याबाबत मॅकेनिकल विभाग डी.पी. क्रं.७४२३, दि. १२/११/२०१३ अन्वये सदरचे आर.ओ.प्लँटचे निघणारे रिजेक्ट वॉटर वाया जावू नये यासाठी सदरचे रिजेक्ट वॉटर पुर्नवापरासाठी घेणेकरीता प्लंबींग कनेक्शन करुन घेणेसाठी कळविण्यात आलेले आहे.

सदरचे काम करणेसाठी आवश्यक साहित्य सध्या पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नाही. यासाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करुन पाईपलाईन कनेक्शन करण्याचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल. यासाठी आवश्यक साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अं.नं. | मटेरियल तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | यु.पि.व्ही.सी.पाईप- १" | फिनोलेक्स | १५०० | फुट | २४.०० | ३६,०००.०० |
| ०२ | यु.पि.व्ही.सी.एलबो- १" | फिनोलेक्स | ११० | नग | २४.०० | २,६४०.०० |
| | यु.पि.व्ही.सी. टी- १" | फिनोलेक्स | ८० | नग | ३०.०० | २,४००.०० |
| ०३ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- १" | फिनोलेक्स | ७५ | नग | २४.०० | १,८००.०० |
| ०४ | यु.पि.व्ही.सी. सोल्युशन | | ०२ | लिटर्स | १०००.०० | २,०००.०० |
| ०५ | जी.आय.क्लॅप पट्टी- १" | | ६० | नग | ०५.०० | ३००.०० |
| ०६ | प्लंबींग खीळे- २.१/२" | | २० | किलो | ८५.०० | १,७००.०० |
| | | | | | **एकुण-** | **४६,८४०.००** |
| | | | | | **वॅट १२.५%-** | **५,८५५.००** |
| | | | | | **एकुण -** | **५२,६९५.००** |

साईआश्रम प्रकल्प भाग- १ व साई धर्मशाळा येथील आर.ओ.प्लँटचे निघणारे रिजेक्ट वॉटर वाया जावू नये यासाठी ते पुर्नवापरास घेणेसाठी प्लंबींग कनेक्शन करणेकरीता साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे **रु.५२,६९५/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे साहित्य कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.५२,६९५/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.९७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्प भाग-०१ व साईधर्मशाळा येथील प्लंबींगचे कामांसाठी आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५२,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.४०** **नववर्ष- २०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री हर्षल भगत, सुरत (गुजरात) आपले पत्र दि.१६/११/२०१३. पत्रान्वये कळविले की, श्री नववर्ष - २०१४ निमित्ताने ( दिनांक ०१/०१/२०१४ ) रोजी समाधी मंदिर, व्दारकामाई,चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री मुकेश गुप्ता यांना श्री पुण्यतिथी उत्सव-२०१३, श्री राजेंद्र तलवार, यांनी दिपावली निमित्ताने व श्री राजेंद्र डंग, दिल्ली यांना श्री दत्त जयंती निमित्ताने फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संरक्षण विभागा मार्फत फुल सजावटीचे सामान तपासणी करण्यात येते, फुल सजवाटीचे काम करणारे कारागीर यांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर व फोटो इ. माहिती घेण्यात येते.

श्री हर्षल, भगत, सुरत यांना दिनांक ०१/०१/२०१४ रोजी नववर्ष निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरात फुल सजावट करणेस परवानगी देणेस व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र .६०९ अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी ०१ AC रुम, दर्शन , भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व जेवाणाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करता येईल

तरी फुल सजावट करणेस व देणगीदार,फुल सजावट करणारे कारागीर यांना राहण्याची, जेवणाची, दर्शनाची सोय करता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभाग प्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.४१** **श्री साईप्रसादालयातील सोलर कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन करणेचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविकः-** श्री साईप्रसादालयातील अन्न शिजविणेकामी इंधन खर्चात बचत होणेसाठी भारतातील सर्वात मोठा सोलर स्टीम कुकींग प्रकल्प दिनांक ३० जुलै २००९ रोजी कार्यान्वित करणेत आलेला आहे. प्रकल्पापासून दररोज सरासरी एक टन अन्न शिजले जाते. परंतु नविन IBR कायाद्यानुसार प्रकल्पाचे मॉडीफिकेशनचे काम केलेमुळे प्रकल्पाची क्षमता वाढणार आहे. १७ जुलै २०१३ पासून IBR मॉडीफिकेशनचे काम मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांना देणेत आलेले असून ते काम पुर्ण झालेले असुन हायड्रोलिक टेस्टींग घेऊन पाईपलाईन इन्सुलेशन करणेचे काम बाकी आहे.

प्रकल्प कार्यान्वित होऊन चार वर्ष कालावधी झालेला असल्याने प्रकल्पाचे स्टीम हेडर मध्ये मोठया प्रमाणात स्केल साचलेले आहे. प्रकल्प कार्यान्वित करणेपुर्वी सदरचे स्केल काढणे आवश्यक आहे. स्केल साचलेले असल्याने हेडर मधून स्टीम आऊटलेट पाईप लाईनद्वारे बाहेर येते व सदरचे पाईपलाईन मध्ये साचते. त्यामुळे पाईपलाईन मध्ये स्केल साचून पाईप लाईन बंद होऊन लिकेज होऊ शकते. प्रकल्पास एकुण १९ नग हेडर असून प्रत्येक हेडर मधून केमिकल सक्युलेशन करणे आवश्यक आहे. केमिकल सक्युलेशन करणेकरीता प्रॉपर केमिकल, सक्युलेशन पंप व सक्युलेशन करणेकामी आवश्यकतेनुसार ॲसेंम्ब्ली करावी लागणार आहे. प्रत्येक १९ हेडर पैकी १७ हेडरची क्षमता ५०० लि.ची असल्याने त्या क्षमतेचा पंप व केमिकल लागणार आहे.

प्रकल्पाचे IBR मॉडीफिकेशनचे काम पुर्ण झालेले असून हायड्रोलिक टेस्टींग करणेपुर्वी केमिकल सर्क्युलेशन करणे आवश्यक आहे. त्याकामी IBR मॉडीफिकेशनचे काम करत असलेले मे. आदर्श इंजिनिअरीग वर्क्स, आंबेजोगाई यांनी केमिकल सक्युलेशनचे दरपत्रक दिलेले आहे. दरपत्रक मध्ये त्यांनी केमिकल, लेबर चार्जेस, मेकॅनिकल केमिकल सर्क्युलेशन चार्जेसह एकत्रित १९ नग हेडर करीता सर्व कर व खर्चासह रक्कम रु. १,४०,०००/- खर्च कळविलेला आहे. मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचेकडे सोलर स्टीम हेडर(बॉयलर) चे केमिकल सर्क्युलेशन करणेकामी आवश्यक असणारे पंप, केमिकल व मेकॅनिकल सिस्टीम उपलब्ध आहे. तसेच त्यांचे व्यतिरीक्त सोलर स्टीम हेडर (बॉयलर) चे केमिकल सर्क्यलेशन करणारी एजन्सी स्थानिक ठिकाणी नाही.

**मागणीः-** प्रकल्पाचे सोलर स्टिम हेडर (बॉयलर) ची हायड्रोलिक टेस्टींग करणेपुर्वी प्रकल्प तातडीने कार्यान्वित होणेसाठी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचेकडून केमिकल सर्क्युलेशन करुन घेता येईल. सदरचे सोलर स्टीम हेडर (बॉयलर)चे केमिकल सर्क्युलेशन केलेशिवाय प्रकल्प कार्यान्वित करता येणार नाही. सोलर स्टीम प्रकल्पाचे तज्ञ सल्लागार डॉ. एम. जी. ताकवले सर (माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) हे दिनांक १६.११.२०१३ रोजी प्रकल्पाची पाहणी करणेस आलेले असतांना त्यांनी केमिकल सर्क्युलेशन तातडीने करणेस सांगितलेले आहे. मे.आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांनी दिलेले दरपत्रकानुसार एकत्रित रक्कम रु.१,४०,०००/- खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत**ः- सोलर स्टीम कुकींग प्रकल्प कार्यान्वित होणेस विलंब होऊ नाही, याकरीता IBR चे मॉडीफिकेशनचे काम करीत असलेली अधिकृत एजन्सी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचेकडून तातडीने काम करुन घेतलेले आहे. त्याकामी येणाऱ्या एकत्रित (लेबर, केमिकल, वाहतूक व टॅक्स) रक्कम रु.१,४०,०००/- चे कार्योत्तर खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४२** **स्टेनलेस स्टील कुकिंगरेंज खरेदीकामी खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रास्ताविक :-** श्री साईप्रसादालयात व्हि.आय.पी. साठी नाष्टा, जेवन कामाकरीता दोन छोटया साईजच्या कुकींग रेंज (भट्टया) खरेदी करणेस व त्याकामी रक्कम रु. २०,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय मान्यात घेणेत आलेली होती. त्यानुसार कुकींग रेंजचा पुरवठा करणाऱ्या चार पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यापैकी मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांनी बंद पाकिटात विहीत मुदतीत दरपत्रक दिलेले होते व मास्टर एन्टरप्राईजेस, पुणे यांनी ईमेलवर दरपत्रक दिलेले होते. मेकॅनिकल

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



विभागाच्या दिनांक १४.१०.२०१३ रोजीचे मंजूर टिपणीने राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे दरपत्रक उघडणेत आलेले आहे. त्यानुसार दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | मास्टर एन्टरप्राईजेस, पुणे | मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक एकुण रक्कम | १६,०००/- | १८,२५०/- |
| २. | व्हॅट | २,०००/- | -- |
| ३ | एकुण | १८,०००/- | १८,२५०/- |
| ४ | २ नग कुकींग रेंज करीता एकूण रक्कम | **३६,०००/-** | ३६,५००/- |

उपरोक्त तक्तामध्ये मास्टर एन्टरप्राईजेस, पुणे यांचे दर मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे पेक्षा कमी आहे. त्यामुळे मास्टर एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून दोन कुकींग रेज खरेदी करता येईल.

**मागणी:-** श्री साईप्रसादालयातील दोन कुकींग रेज खरेदी करणेकामी रक्कम रु. २०,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्याता घेणेत आलेली होती. परंतु निम्नत्तम दरपत्रकातील दरानुसार दोन कुकींग रेंज खरेदी करणेकामी रक्कम रु. ३६,०००/- खर्च येत असल्याने सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान:- तांत्रिक**

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- उपरोक्त तक्तातील निम्नत्तम पुरवठादार मे. मास्टर एन्टरप्राईजेस, पुणे यांचे कडून दोन स्टे. स्टील कुकींग रेंज खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३६,०००/- चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.साईप्रसादालयासाठी आवश्यक असलेले ०२ नग स्टेनलेस स्टील कुकींग रेंज प्रस्तावात नमुद केलेले निम्नतम दरधारक मे. मास्टर एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४३ स्टेनलेस स्टील जॅकेटेड स्टीम कुकर्स दुरुस्ती करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्ताविक :-** श्री साईप्रसादालयात प्रतिदिन ४० ते ४५ हजार साईभक्तांचे प्रसाद भोजन बनविणेत येते. प्रसाद भोजन वेळेवर बनविणेसाठी किचनमध्ये अनेक स्वरुपाचे ऑटोमायझेशन केलेले आहे. भात, दाळ शिजविणे, भाजीकरीता गरम पाणी व बटाटे उकडणे यासाठी १५० लिटर क्षमतेच्या स्टे. स्टील जॅकेटेड १० नग स्टीम कुकर्सचा वापर करणेत येतो.

दैनंदिन वापराने व सततचे उष्णतेमुळे १० पैकी ४ स्टीम कुकर्सचे स्टे.स्टील शॉफ्ट बेन्ड झालेले होते. जॅकेटेड भागातून स्टीम लिकेज होत असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती दिनांक ३०.३.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं२९९ चे मान्यतेने ४ नग स्टीम कुकर्स पुरवठादार व उत्पादक मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडीया, मुंबई यांचेकडून दुरुस्त २७.६.२०१३ रोजी दुरुस्त करुन आणलेले आहे. प्रती कुकर करीता रक्कम रु. ८५,०००/- + टॅक्स खर्च आलेला होता.

उर्वरीत ६ कुकर्स दुरुस्त करणेकामी दिनांक ११.७.२०१३ रोजीचे मंजूर टिपणीने मान्यता घेणेत आलेली आहे. दुरुस्ती बाबत कुकर्स पुरवठादार व उत्पादक मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडीया, मुंबई यांना दुरध्वनी केला असता त्यांनी आहे त्या दरात कुकर्स दुरुस्ती करुन देणेचे दिनांक २१.११.२०१३ रोजीचे दरपत्रकानुसार कळविलेले केलेले आहे. उपरोक्त ६ कुकर्स दुरुस्तीसाठी एकाच वेळेस न पाठवता टप्या-टप्याने पाठवावे लागणार आहे. जेणेकरुन प्रसाद भोजन बनविणेकामी भक्तांची गैरसोय होणार नाही.

**मागणी:-** श्री साईप्रसादालयातील स्टीम कुकर्स दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेचे कामात अत्यंत महत्वाचे असल्याने सर्व कुकर्स कार्यान्वित राहणे आवश्यक आहे. सदर कुकर्सचे स्टे. स्टीलचे असल्याने स्थानिक ठिकाणी प्रस्तावित काम कुणी करत नाही. त्यामुळे कुकर्सचे पुरवठादार व उत्पादक मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडीया, मुंबई यांचेकडून नादुरुस्त झालेले कुकर्स आवश्यकतेनुसार दुरुस्त करुन घेता येईल. त्याकामी ६ नग स्टीम कुकर्स दुरुस्ती करीता रक्कम रु. ५,१०,०००/- + टॅक्स खर्च येणार असल्याने सदरचा विषयास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान :-** तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** तरी स्टीम कुकर्सचे उत्पादक व पुरवठादार यांचेकडून उर्वरीत सहा स्टीम कुकर्स टप्प्याने दुरुस्त करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या प्रती कुकरसाठी रक्कम रु. ८५,०००/- + टॅक्स याप्रमाणे एकुण सहा कुकर्स करीता रक्कम रु. ५,१०,०००/- + टॅक्स चे खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.९७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४४ रुग्णालये विभागांच्या मॉर्च्युरी दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविकः-** श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ रुग्णालयामध्ये मयत होणाऱ्या रुग्नांची मृतशरीर ठेवणेसाठी असलेली मॉर्च्युरी यंत्रणा रुग्णालय विभागाने ब्लु स्टार कंपनीचे अधिकृत वितरक मे.मेगास्टार इंजि.पुणे यांचेकडून सन २००८ साली खरेदी केलेली आहे. मागील ०५ वर्षापासून दोन्ही यंत्रणा अहोरात्र कार्यरत आहे. मात्र सततच्या वापरामुळे दोन्ही केबीनचे ड्रावर डोअर खराब झालेले असून दरवाजे पुर्णपणे बंद होत नाही. ड्रावरला लॉक तसेच, स्ट्रेचर व्हिल तुटलेले आहे. वरीलपैकी दोन्ही यंत्रणेच्या ए.सी सिस्टिम वेळोवेळी दुरुस्ती केलेली आहे. मात्र त्या यंत्रणेचे स्पेअर पार्ट व मटेरिअल बाजारात डिलर शिवाय उपलब्ध होत नाही.

दोन्ही मॉर्च्युरीसाठी आवश्यक स्पेअरपार्ट ब्लू स्टार कंपनीच्या अधिकृत डिलर मेगास्टार इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून दरपत्रक मागविणेस दिनांक १९.१०.२०१३ रोजीचे प्रशासकिय मान्यता घेणेत आलेली होती. त्यानुसार मेगास्टार इंजिनिअरींग, पुणे यांनी दिनांक ५.१२.२०१३ रोजी ईमेलद्वारे दरपत्रक दिलेले आहे. दरपत्रकानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Mortuary | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 6 Body | MS Powder coated Mortuary carriage and frame | 3 | 2500.00 | 75000.00 |
| 2 | | Door lock | 1 | 4000.00 | 4000.00 |
| 3 | | Labour charges for dismantling of three carriage & Frame installation | 3 | 4000.00 | 12000.00 |
| 4 | | Labour chages for Servicing of Refrigeration Unit | 1 | 2000.00 | 2000.00 |
| 5 | 4 body | Supply of Compressor | 1 | 13000.00 | 13000.00 |
| 6 | | Door Lock | 1 | 4000.00 | 4000.00 |
| 7 | | Dismantling of existing Compressor and installation of new compressor and serving of refrigeration unit. | 1 | 8000.00 | 8000.00 |
| 8 | | Lobour charges for rectification of 2nos stretcher to avoid collision with wall | 1 | 2000.00 | 2000.00 |
| | Vat 12.5% on item no.1,2,5 & 6 | | | | 12000.00 |
| | Service Tax 12.36% on item nos. 3,4,7 & 8 | | | | 2966.40 |
| | Total | | | | 1,34,966.40 |
| | **Round Off Amount – Total** | | | | **1,34,966.00** |

**मागणी :-** हॉस्पीटल मधील मॉर्च्युरी दुरुस्त करणे अत्यावश्यक असून त्याकामी रक्कम रु. १,३४,९६६/- खर्च येणार आहे. उपरोक्त प्रमाणे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यता घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमान :-** तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत**:- तरी हॉस्पीटल मधील मॉर्च्युरी दुरुस्तकाम ब्लु स्टार कंपनीचे अधिकृत वितरक मे.मेगास्टार इंजि. पुणे यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. १,३४,९६६/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमधील मॉर्च्युरी यंत्रणा दुरुस्तीचे काम ब्लु स्टार कंपनीचे अधिकृत वितरक मे.मेगास्टार इंजि. पुणे यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. १,३४,९६६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४५ माहे डिसेंबर- २०१३ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे डिसेंबर,२०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | विजया बँक, शिर्डी | ३/१२/२०१३ | १,६४,१२,२९१/- |
| २) | विजया बँक, शिर्डी | ३/१२/२०१३ | १,६४,१२,२९१/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ३) विजया बँक, शिर्डी | ३/१२/२०१३ | १,६४,१२,२९१/- |
| ४) विजया बँक, शिर्डी | ३/१२/२०१३ | १,६४,१२,२९१/- |
| ५) आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | ४/१२/२०१३ | ५२,००,२२६/- |
| ६) आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | ७/१२/२०१३ | ४४,६२,६४९/- |
| ७) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ७/१२/२०१३ | १९,६९,४७,४९३/- |
| ८) विजया बँक, शिर्डी | १७/१२/२०१३ | ३,२८,२४,५८२/- |
| ९) विजया बँक, शिर्डी | १७/१२/२०१३ | २,१८,८३,०५५/- |
| १०) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १७/१२/२०१३ | ५,४७,०७,६३७/- |
| ११) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | २०/१२/२०१३ | १२,०३,६८,५७०/- |
| १२) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | २१/१२/२०१३ | ३,२८,२७,७९२/- |
| १३) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | २६/१२/२०१३ | १०,९४,४७,३७२/- |
| १४) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ३१/१२/२०१३ | २१,८८,९४,७४४/- |
| दैनंदिन खर्च वजा जाता माहे डिसेंबर २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | ९६,३२,१३,२८४/- |

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम रु. ९६.३२ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याजदराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.९६.३२ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या सर्व स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.९६.३२ कोटी मात्रची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४६** **भाडोत्री मालवाहतुक वाहनाचे बीलांबाबत.**

**प्रस्ताव-** संदर्भिय पत्राद्वारे श्री साई प्रसादालय विभागाने साई आश्रम निवासस्थान मधील आर ब्लॉक या इमारातीचे पहिल्या मजल्यावर साई भक्तांसाठी प्रायोगिकतत्वावर स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था करावयाची असलेने श्री साई प्रसादालयातून तयार प्रसाद भोजन साईआश्रम येथे ने-आण करणे कामी वाहन विभागाकडून एक मालवाहतुक वाहनाची मागणी केलेली होती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वाहन विभागाकडे मालवाहतुक वाहने कमी असलेने प्रसादभोजन ने-आण करणेकामी सकाळी ०९.०० ते रात्री १०.०० या वेळेत भाडोत्री वाहन लावणेस व या कामी परिसरातील मालवाहतुक वाहनधारकांकडुन कोटेशन मागविणेस वाहन विभागाकडील दि.२०/०७/२०१३ चे टिपणीने मान्यता मिळालेली होती. त्यानुसार प्राप्त झालेली कोटेशन दि.२८/०८/२०१३ रोजी प्रशासकिय अधिकारी (वाहन विभाग) यांचे समक्ष उघडणेत आली होती. परिसरातील खाजगी मालवाहतुक वाहनधारक यांनी कोटेशन मध्ये देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| **अ. नं.** | **मालवाहतुक वाहनधारकाचे नांव** | **वाहन क्र / प्रकार** | **प्रति दिन दर (रु.)** (सकाळी ९.०० ते रात्री १०.००) |
|---|---|---|---|
| ०१ | श्री मंगेश रामचंद्र शिंदे, शिरडी | MH-१५-AG-५२४४ अशोक लेलॅण्ड | **रु.७५०/-** |
| ०२ | श्री ज्ञानेश्वर केशव गायके, शिरडी | MH-१५-AG-२७८५ महिंद्रा पिकअप | रु.८२१/- |
| ०३ | श्री प्रमोद दगडु अनाप, शिरडी | MH-१७-K-९७५२ महिंद्रा मिनीडोर | रु.८००/- |
| ०४ | बाळासाहेब तुकाराम गिते, शिरडी | MH-१५-AG-९८८८ महिंद्रा पिकअप | रु.९००/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचारकरता अ.नं.०१ चे श्री मंगेश रामचंद्र शिंदे, शिरडी यांनी देवु केलेले दर रु.७५०/- (अक्षरी रक्कम रु.सातशे पन्नास) प्रती दिन मात्र निम्नतम आहेत.

सदर दरानुसार भाडोत्री वाहन लावलेस अथवा त्याऐवजी संस्थान वाहन वापरलेस खालील प्रमाणे मासीक खर्च अपेक्षीत आहे.

| **अ. नं.** | **तपशिल** | **संस्थान वाहन वापरलेस येणारा अंदाजे खर्च** | **भाडोत्री वाहन वापरलेस येणारा खर्च** (३० दिवसांकरीता) |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन वाहन खरेदीचे रक्कमे वरील व्याज खर्च (नवीन वाहनाची किंमत रु.६,००,०००/- वर ८.५% दराने) | ४,२५०.०० | **रु.२२,५००.००** |
| ०२ | इंधन खर्च- (मासीक अंदाजे १००० कि.मी. वापर) | ५,८००.०० | |
| ०३ | वाहन चालक पगार खर्च (दोन शिफ्टमध्ये प्रत्येकी एक कंत्राटी वाहन चालक) | १६,२००.०० | |
| ०४ | दुरुस्ती खर्च- | ५००.०० | |
| | **एकुण खर्च (रु.)** | **२६,७५०.००** | |

वरील प्रमाणे संस्थान वाहन वापरलेस मासीक रु.२६,७५०/- पर्यंत खर्च अपेक्षीत होता. तसेच भाडोत्री वाहन वापरलेस रु.२२,५००/- मात्र खर्च येणार असलेने निम्नतमदरधारक, श्री मंगेश रामचंद्र शिंदे, शिरडी यांना त्यांचेकडील मालवाहतुक वाहन रु.७५०/- प्रति दिन या दराने भाडोत्री तत्वावर लावणे कामी इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/२५८९/२०१३ दि.०६/०९/२०१३ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे.

भाडोत्री वाहनाचे बिलापोटी अदा करण्यात येणाऱ्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेची मान्यता घेणे आवश्यक असलेने साई आश्रम निवासस्थान मध्ये साईभक्तांसाठी प्रायोगिक तत्वावर स्वयंसेवी प्रसाद भोजन व्यवस्थेस चांगला प्रतिसाद मिळत आहे काय? सदरची सुविधा कधीपर्यंत सुरु ठेवणार? याबाबत श्री साई प्रसादालय विभागाकडे विचारणा करण्यात आली होती.

त्यानुसार, अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांनी दि.११/११/२०१३ रोजीचे पत्राने, मा. अध्यक्ष साहेब यांनी केलेल्या सुचनेनुसार साईआश्रम येथे भाग-०१ येथे प्रायोगिक तत्वावर स्वयंसेवी भोजनव्यवस्था सुरु करणेबाबत सुचना केलेली होती. त्यानुसार स्वयंसेवी भोजनव्यवस्था सुरु करणेत आलेली असून त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

स्वयंसेवी भोजनव्यवस्था चालू झालेपासून भोजन घेतलेल्या साईभक्तांची संख्या खालील प्रमाणे

| अ.नं. | महिना | भोजन घेतलेल्या भक्तांची संख्या | सरासरी |
|---|---|---|---|
| ०१ | २१ जुलै २०१३ पासून | २१,७३० | १,९७५ |
| ०२ | ऑगस्ट २०१३ | ५७,३१७ | १,८४९ |
| ०३ | सप्टेंबर २०१३ | ५३,९२२ | १,७९७ |
| ०४ | ऑक्टोबर २०१३ | ७०,७१४ | २,२८१ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



साईआश्रम येथील उपहारगृह चालू करणेची कार्यवाही ही कॅन्टीन विभागामार्फत होत असल्याने जोपर्यंत भाडेतत्वावर उपहारगृह चालविले जात नाही तोपर्यंत श्री साईभक्तांचे सुख सुविधेकरीता प्रसादालयामार्फत स्वयंसेवी भोजनव्यवस्था चालू ठेवावी लागणार आहे, असे कळविलेले आहे.

तरी साईआश्रम निवासस्थान येथे जोपर्यंत भाडे तत्वावर उपहारगृह चालविले जात नाही तोपर्यंत श्री साई प्रसादालयामार्फत चालु करण्यात आलेल्या स्वयंसेवी भोजनव्यवस्था करीता श्री साई प्रसादालयातुन प्रसाद भोजन ने-आण करणेकामी दि.०९.०९.२०१३ पासून प्रति दिन रु.७५०/- या दराने भाडोत्री तत्वावर लावण्यात आलेल्या वाहनाचे बिलापोटी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, संस्थानसाठी मालवाहतुकीकरीता ०२ लहान वाहने देणगी स्वरुपात मिळाल्यास देणगीदार साईभक्तांकडून घेण्यात यावी, असे ठरले** (कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४७** **दक्षिणा पेटी रक्कम मोजणी कक्षाकडील बायोमेट्रीक फिंगर प्रिंन्ट पंचींग मशिनचे वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये साधारणतः आठवडयातून दोन वेळेस दक्षिणा पेटयांची मोजणी करणेत येते. मोजणी कामासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांची येण्याची व जाण्याची वेळ नोंदणी होणेसाठी तेथे संरक्षण विभागामार्फत एक हस्तलिखीत नोंदवही ठेवणेत येत होती. कर्मचाऱ्यांचे जाण्याची व येण्याची वेळ नोंद होणेसाठी कॅश काऊंटींग हॉल येथे एक स्वतंत्र बायोमेट्रीक मशिन बसवून मिळावे अशी मागणी लेखाशाखेमार्फत उपरोक्त संदर्भीय क्र.१ व २ चे पत्रान्वये करणेत आली होती. त्यास अनुसरून सदरचा विषय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२०१० रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५ नुसार मे.ॲलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लिमिटेड, मुंबई यांना संदर्भीय क्र.४ अन्वये पुरवठा आदेश देणेत आला होता.

त्यास अनुसरून मे.ॲलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लिमिटेड, बोरीवली (पश्चिम) मुंबई यांचेमार्फत दक्षिणा पेटी मोजणी हॉलमध्ये दि.०१-०४-२०१० ते दि.०३-०४-२०१० या कालावधीत बायोमेट्रीक फिंगर प्रिन्ट मशिनचे इन्स्टॉलेशन करणेत आलेले आहे. तसेच सदर बायोमेट्रीक फिंगर प्रिन्ट मशिन्सला बांधकाम विभागामार्फत सेफ्टी वुडन बॉक्स तयार करून बसवून देणेत आलेला आहे व तेव्हापासून सदर बायोमेट्रीक फिंगर प्रिन्ट मशिन कार्यान्वीत करून देणेत आलेली आहे. सदर मशिन सोबत देणेत आलेले कॉम्प्युटर व सॉफ्टवेअर लेखाशाखेच्या ताब्यात देणेत आलेले आहे व संबंधीत संगणक व सॉफ्टवेअर आय.टी.विभागाकडून कार्यान्वीत करून दिलेले आहेत.

यापूर्वी संस्थान कर्मचाऱ्यांचे आगमन व निर्गमनाचे वेळेची नोंद करण्यासाठी अनुक्रमे १) प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत), २) चौकशी व निवासस्थान कार्यालय, ३) श्री साईबाबा हॉस्पीटल, ४) श्री साईनाथ हॉस्पीटल, ५) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, ६) आय.टी.आय., ७) मुंबई कार्यालय, ८) संरक्षण कार्यालय व ९) श्री साई प्रसादालय या ठिकाणी फिंगर प्रिंन्ट अटेंडन्स मशिन्स बसविणेत आलेले असून, सदर अटेंडन्स मशिन्स व त्यासोबत असलेले संगणक व सॉफ्टवेअर हे संबंधीत विभागाचे ताब्यात असल्यामुळे त्यांच्या नोंदी ज्या-त्या संबंधीत विभागाचे डेडस्टॉकला घेणेत आलेल्या आहेत. याबाबत आजपर्यंत कुठल्याही प्रकारचे प्रश्न अथवा अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.

दक्षिणा पेटी रक्कम मोजणी कक्षामध्ये लेखाशाखेच्या लेखी मागणीवरूनच मे.ॲलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लिमिटेड, बोरीवली (पश्चिम) मुंबई यांचेकडून बायोमेट्रीक फिंगर प्रिंन्ट मशिन्स दि.०१-०४-२०१० ते दि.०३-०४-२०१० या कालावधीत बसवून देणेत येवून कार्यान्वीत करणेत आलेले आहे.मे.ॲलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.मुंबई यांनी सदर बायोमेट्रिक फिंगर प्रिन्ट पंचिंग मशिनचा वॉरंटी पिरीयड दि.३१-०३-३०१३ रोजी संपुष्टात आलेला असल्याचे त्यांनी दि.०६-११-२०१३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.त्यात त्यांनी यापुर्वी इन्टॉल करणेत आलेल्या इतर १० फिंगर प्रिंन्ट मशिनचे संदर्भातील वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (A.M.C.) चे अटी-शर्तीस अधिन राहून त्यातील दराप्रमाणेच रु.२०,०००/- दरवर्षी याप्रमाणे ए.एम.सी.चार्जेसचे रक्कमेत पुढील एक वर्षासाठी काम करणेस तयार आहोत.त्याचा कालावधी दि.३१-०३-२०१३ ते दि.३०-०३-२०१३ असा राहिल असे नमुद केलेले आहे.

सबब, मे.ॲलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लिमिटेड, बोरीवली (पश्चिम) मुंबई यांना माहे एप्रिल २०१० मध्ये दक्षिणा पेटी मोजणी कक्षात बसविणेत आलेल्या १ (एक) बायोमेट्रिक अटेंन्डन्स सिस्टिम मशिन व टाईम ॲन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे दिनांक ०१-१०-२०१३ ते दि.३०-०९-२०१४ या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रक्ट) देणेबाबत व सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्टकामी पुर्वीचेच दराप्रमाणे रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये विस हजार) मात्र प्रतिनग या प्रमाणे रक्कम सर्व्हिस टॅक्स धरुन मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.मुंबई यांना अदा करणेस व तसेच प्रचलित दराप्रमाणे प्रति वर्षी एकुण रु.२०,०००/- कॉन्ट्रक्ट रक्कम त्यांना मान्य असल्यास यापुढे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दरवर्षी वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रक्ट्रचे नुतनीकरण करणेस व त्याकामी प्रतिवर्षी एकुण रक्कम रु.२०,०००/- मात्र सर्व्हिस टॅक्स धरुन त्यांना आदा करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.४८ शासकीय दराने दिल्या जाणाऱ्या जाहिरातीच्या प्रसिध्दीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि. १५/०९/२०१२ च्या सभेतील निर्णय क्र.७८६ नुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत संस्थानच्या विविध विभागांच्या निविदा सूचना, पाहिजेत, प्रवेश सूचना आदि प्रकारच्या जाहिराती विविध वर्तमानपत्रात शासकिय दरात प्रसिध्द करण्याचा निर्णय झालेला आहे. याकरिता संस्थानच्या जाहिराती खरेदी करावयाच्या मालाचा किमतीनूसार माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या मुंबई, नाशिक व अहमदनगर या विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात येतात.

तथापी शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करणेकामी पारित झालेल्या शासन निर्णय क्र.जाहिरात २००९/प्र.क्र.१३७/का-३४ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ३१.०८.२००९ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

०१) शासनाच्या कोणत्याही विभागांनी शासकीय जाहिराती जाहीरात अभिकरणांमार्फत (एजन्सीमार्फत) देऊ नयेत. शासनाच्या सर्व जाहिरातींचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पध्दतीने (रोटेशन) करणे सर्व विभागांवर बंधनकारक राहील.

०२) दिनांक १ मे, २००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र.५-इ मधील वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातांची मुल्य मर्यादा खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | एका कामाचे मूल्य | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार | जाहिरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.२० लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | जिल्हा माहिती अधिकारी | एक 'क' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.२० लाखाच्यावर ते ५५ लाखांपर्यत आहे अशी जाहिरात | विभागीय माहिती उपसंचालक | एक 'ब' वर्ग दैनिक व साप्ताहिक |
| ३ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.५५ लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात | मुख्यालय | १) संबंधित विभागातील 'अ' वर्ग दैनिकास व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका 'क' वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे सें.मी.चे प्रमाण लक्षात घेऊन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल. |

०३) मा.उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय नाशिक यांनी, सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.पीयूबी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दि. १ मे २००१ नुसार शासकीय दरात जाहिरात प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विविध विभागीय कार्यालयास किमान १० दिवस अगोदर हस्तदेय किंवा अतिशिघ्र नोंदणीकृत डाकेने प्राप्त होणे अपेक्षित आहे, असे कळविलेले आहे.

संस्थानच्या विविध विभागांच्या जाहिराती मंजूरीनंतर जनसंपर्क विभागामार्फत प्रसिध्दीस पाठविल्या जातात. परंतु बरेचसे विभाग जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. ५५ लाखापेक्षा कमी असूनही जाहिरात प्रसिध्द करणेसाठी मुंबई,पुणे, नाशिक, औरंगाबाद, जळगाव या शहराशी निगडीत **'अ'** दर्जाच्या वर्तमानपत्रात जाहिरात देण्याचा आग्रह धरतात. त्यांच्या धोरणानुसार संस्थानशी निगडीत माल पुरवठादार या मोठया शहरात जास्त प्रमाणात असतात. जाहिरात **'ब'** दर्जाच्या वर्तमान पत्र व साप्ताहिक यामध्ये प्रसिध्दीस दिल्यावर त्यास योग्य प्रतिसाद मिळत नाही. आणि संस्थानला योग्य पुरवठादार मिळत नाही. त्यामुळे संबधित विभागाच्या मागणीनुसार एखाद्या जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. ५५ लाखापेक्षा कमी असूनही योग्य प्रतिसाद मिळणेसाठी मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,जळगाव आदि.मोठया शहरात **'अ'** दर्जाच्या राज्यस्तरीय वर्तमान जाहिरात प्रसिध्द करणे गरजेचे असल्याने **'ब'**दर्जाच्या वर्तमान पत्रात विभागीय स्तरावर प्रसिध्दीसाठी न पाठविता राज्यस्तरावरील **'अ'** वर्ग दैनिकात प्रसिध्दीसाठी पाठवावी लागते.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. ५५ लाखापेक्षा कमी आहे, परंतु जाहिरातीला जास्त पुरवठादारांचा प्रतिसाद मिळणेसाठी सदरच्या जाहिराती विभागीय स्तरावरील **'ब'** दर्जाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द न करता संबंधीत

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



विभागाच्या मागणीनुसार राज्यस्तरावरील **'अ'** दर्जाच्या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस कायमस्वरूपी मान्यता असावी. तसेच सदरच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येत असल्याने शासकीय दरानेच बिलाची आकारणी करण्यात येते.

तरी वरील बाबींवर व्यवस्थापन समितीच्या सभेत चर्चा होवून निर्णय होण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.४९** **शिर्डी महोत्सव २०१३ चे अंदाजपत्रक मान्यता व कलाकार निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावी सदरचा दिवस श्रींच्या सान्निध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी ३१ डिसेंबरला भारतातून तसेच परदेशातून प्रचंड संख्येने साईभक्त शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रींच्या दर्शनापासून कोणीही वंचीत राहू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार समाधी मंदीर भक्तांना साईबाबांचे दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात येत असते. ३१ डिसेंबरच्या रात्री भजन, नृत्य,गायन वगैरे कार्यक्रम आयोजीत केले जातात. शिर्डी महोत्सव हा सन २००४ पासून सुरु झालेला आहे.

**अ) अंदाजपत्रकः** सन २०१२ चे शिरडी महोत्सवा करीता झालेल्या व सन २०१३ चे शिर्डी महोत्सवासाठी अपेक्षीत खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | तपशील | श्री शिर्डी महोत्सव २०१२ | | श्री शिर्डी महोत्सव अंदाजे खर्च २०१३ |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी व स्टेज | ६०,०००-०० | ३२,५००-०० | ४०,००० |
| २ | जाहिरात व बोर्ड | २०,०००-०० | ३१२०-०० | १५,००० |
| ३ | कलाकार मानधन व प्रवास खर्च | ९०,०००-०० | ३७-०० | २५,००० |
| ४ | इतर किरकोळ खर्च (मंदिर सजावट, जादा कर्मचारी व इतर खर्च ) | ९०,०००-०० | २३,६२५-०० | २,५०००० |
| | **एकूण खर्च** | **२,६०,०००-०** | **५९,२८२-००** | **३,३०,०००-००** |

**ब) कलाकार निश्चीतीः-** याहीवर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सवासाठी मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.३१/१२/२०१३ रोजी गायन व नृत्य कार्यक्रम व मानधन निश्चीत करावे लागणार आहेत. याबाबत आलेल्या अर्जाचा तपशिलवार तक्ता अलाहिदा सादर करण्यात येईल.

**क) कार्यक्रमाचे स्थळः-** मागीलवर्षी साईनगर मैदानावर कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, यावर्षी देखील साईनगर परिसरात आयोजित करता येईल.

मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील अ, ब व क मध्ये नमुद केलेप्रमाणे मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५ )

---

**विषय नं.५०** **साईभजन संध्या कार्यक्रमासाठी साईनगर मैदान मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-** १) मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१८/१०/२००८ चे सभेत निर्णय क्र.८०५ मध्ये " येथुन पुढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यात येऊ नये " असे ठरले आहे याचे काटेकोर पालन करण्यात यावे असे ठरले.

२) साईनगर मैदानाबाबत म.त्रिसदस्यीय समितीचा दि.२८/०४/२०१२ चा निर्णय क्र.३६९ - साईनगर परिसरात संस्थान कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व श्री साईबाबा हॉस्पीटल आहे. साईनगर मैदानात कार्यक्रमास परवानगी दिल्यास कार्यक्रमाचे लाऊड स्पिकरचे आवाजाने श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुगणांना त्रास होतो. याकरीता येथून पुढे साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरण्यास देण्यात येऊ नये.

३) द.३०/०३/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.३२७ - साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरात देऊ नये, याकरिता मागील दोन वर्षामध्ये ज्यांना कार्यक्रमांसाठी मैदान वापरास दिले होते, त्यांना यापुढे साईनगर मैदान कार्यक्रमासाठी मिळणार नाही, असे लेखी पत्र पाठविणेत यावे व साईनगर मैदान कार्यक्रमासाठी मिळणेबाबत अर्ज आल्यास, त्वरीत याविषयी उलट टपाली कळविणेत यावे, असे ठरले.

**प्रस्ताविकः-** उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये अध्यक्ष, साई संगम सेवाभावी संस्था,शिर्डी यांनी दि.११/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये "सालाबाद प्रमाणे दि.३०/०१/२०१४ रोजी श्री साईभजन संध्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी आपल्या व्यवस्थेकडून दरवर्षी आम्हाला कार्यक्रमासाठी साईनगर मैदान देण्यात येते." यावर्षीही सालाबादाप्रमाणे साईनगर मैदान वापरण्याची परवानगी मिळावी. त्यासाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नियमानुसार असलेले शुल्क भरण्यास तयार आहोत. सदर कार्यक्रमाच्या तयारी व मंडप डेकोरेशनसाठी २७/०१/२०१४ ते ३१/०१/२०१४ पर्यत साईनगर मैदान वापरण्यास मिळावे हि विनंती.असे त्यात नमूद केले आहे.

**मागणी:-** साईभजन संध्या कार्यक्रमासाठी संस्थानतर्फे साईनगर मैदान वापरण्यास परवानगी मिळणेबाबत.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** साई संगम सेवाभावी संस्था,शिर्डी यांना सन २००८ पासून साईभजन संध्या कार्यक्रम करणेस साईनगर मैदान वापराबाबत व्यवस्थापन समितीचे मान्यतेने परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांचेकडून साईनगर मैदानाचा सेवा आकार म्हणून रुपये २०००/- एका दिवसाप्रमाणे ७ दिवसाचे रुपये १४०००/- आकारण्यात आले होते. तसेच वीज पुरवठयासाठी डिपॉझिट म्हणून रुपये ३०००/- घेऊन प्रत्यक्ष येणाऱ्या बिलाची रक्कम वजा करुन राहिलेली रक्कम परत केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत :-** साईभजन संध्या हा धार्मिक कार्यक्रम आहे. विशेष बाब म्हणून साईभजन संध्या कार्यक्रमाची परवानगी द्यावी किंवा कसे ? याबाबत आदेश होणेस विनंती.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.९८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, त्रिसदस्यीय समितीच्या दि.३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२७ मध्ये नमुद केलेनुसार अध्यक्ष, साई संगम सेवाभावी संस्था, शिर्डी यांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०५ )

---

**विषय नं.५१** **शिर्डी महोत्सव २०१३ बाबत.**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात साईभजनाने व्हावी व सदरचा दिवस श्रींच्या सान्निध्यात जावा या उददेशाने दरवषी प्रमाणे या वर्षी ही दि.३१/१२/२०१३ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले रहाणार आहे. तसेच मंगळवार दिनांक ३१/१२/२०१३ चे रात्रौ शिर्डी महोत्सव - २०१३ मध्ये गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून खालील प्रमाणे विनंती अर्ज आलेले आहेत.

| अ. नं | दाखल तारीख | कलाकारांचे नाव व पत्ता | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१/१०/२०१३ | श्री.पारस जैन, श्री.प्रविण महामुनी, जिम्मी शर्मा, शिर्डी मो.नं.९८२२५४६८१७ | एक शाम साई के नाम साईभजन | ९ | विनामुल्य |
| २ | ९/११/२०१३ | श्री.सच्चिदानंद आप्पा, मुंबई मो.नं.९८२०१४८६७८ | एक शाम साई के नाम भक्तीसंगीताचा कार्यक्रम | २५ | विनामुल्य |
| ३ | ११/१२/२०१३ | श्री.जगदीश मारुती पाटील ( गायक ) बाबा निवास मुक्काम ओवळा पो.कासार वडवली ठाणे ( पश्चिम ) मो.नं.८०९७२१८१११, ९२२१५५१११११ | साईभजन संध्या | १० | विनामुल्य |

अ.नं. १ ते ३ यांनी विनामुल्य कार्यक्रम मिळावा म्हणून विनंती अर्ज केलेले आहेत. शिर्डी महोत्सवाच्या निमित्ताने ३१ डिसेंबरच्या रात्री भजन संध्या आयोजित केली जाते.

मागील वर्षी खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

| अ नं | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव व पत्ता | कार्यक्रमाचे स्वरुप | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.३१/१२/२०१२ रात्रौ ७.०० ते ९.३० | श्री.पारस जैन, श्री.प्रविण महामुनी, जिम्मी शर्मा, शिर्डी मो.९८२२५४६८१७ | साईभजन संध्या | ०९ | प्रत्येक कलाकारास शॉल, श्रीफळ व १ रुपयाचे नाणे |
| २ | दि.३१/१२/२०१२ रात्रौ ९.३० ते १२.०० | श्री.सच्चिदानंद आप्पा, वेस्टन रेल्वे कॉलनी, ७७/४, माटुंगा रोड, मुंबई | हिंदी , मराठी भक्ती संगीताचा कार्यक्रम | २५ | प्रत्येक कलाकारास शॉल, श्रीफळ व १ रुपयाचे नाणे |

यावर्षी ३१ डिसेंबर रोजी रात्रौ ७ ते १२.०० वाजेपर्यत मागील वर्षी ज्या अ.नं.१ व २ कलाकारांनी कार्यक्रम केलेले आहेत. परत त्यांना हयाही वर्षी संधी देता येईल. व अ.नं. ३ श्री. जगदीश पाटील हयांनीही विनामुल्य कार्यक्रम करण्याची संधी मिळावी म्हणून विनंती केली आहे. तरी त्यांनाही संधी देऊन उपरोक्त अ.नं. १ ते ३ हयांचे कार्यक्रम ३१ डिसेंबर २०१३ रोजी रात्री आयोजीत करता येतील याबाबतचा निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.९८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५ )

---

**विषय नं.५२** **साई भक्तांच्या व कार्यालयीन कामाच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्तनिवासस्थान विभागाकरीता ०४ नविन झेरॉक्स मशिन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या निवासस्थान कार्यालयात भक्तांना राहण्यासाठी खोल्या दिल्या जातात. त्यासाठी प्रथम खोलीची बुकींग करतांना संरक्षणाच्या दृष्टीकोनातुन भक्तांकडुन ओळखीचा पुरावा म्हणुन मतदान कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, आधार कार्ड, आयकर कार्ड, या सारख्या पुराव्याची झेरॉक्स प्रत घेऊन नंतर भक्तांना खोली दिली जाते. भक्तांना फोटोप्रुफची झेरॉक्स प्रत काढण्यासाठी बाहेरील खाजगी झेरॉक्स दुकानात जाते लागते. रात्री खाजगी झेरॉक्सचे दुकाने बंद असल्यामुळे भक्तांना झेरॉक्स प्रत मिळत नाही. भक्तांजवळ फोटोप्रुफची झेरॉक्स प्रत नसल्यामुळे त्यांना खोली देता येत नाही. परिणामी भक्तांची गैरसोय होते.

संस्थानच्या खालील इमारतीमध्ये भक्तांना राहण्यासाठी खोल्या दिल्या जातात.

**१)** श्री साईप्रसाद निवासस्थान **२)** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) **३)** द्वारावती
**४)** साईआश्रम भक्तनिवास **(झेरॉक्स मशीन आहे.)** **५)** साई आश्रम नं.२

उपरोक्त निवासस्थानापैकी अ.नं.४-साईआश्रम भक्तनिवास यांना दि.१५.०८.२०१३ रोजी Kyocere कंपनीचे मॉडेल नं.६५३० एक नविन झेरॉक्स मशीन देणगी घेतलेले आहे. उर्वरीत निवासस्थानांना प्रत्येकी एक असे एकूण ४ झेरॉक्स मशीन खरेदी करुन दिल्यास भक्तांना कार्यालयतच फोटोप्रुफची झेरॉक्स प्रत काढुन लगेचच खोल्या देता येईल. त्यामुळे भक्तांना झेरॉक्स साठी बाहेर इतरत्र जावे लागणार नाही व ताबडतोब खोली देता येईल, पर्यायाने भक्तांचा त्रास कमी होणार आहे. तसेच संस्थानचे कार्यालयीन कामाच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स काढण्याकरीताही सदर मशीनचा उपयोग होणार आहे.

संस्थानचे प्रसादालयामध्ये दि.१३/०३/२०१० रोजी क्योसेरा कंपनीचे (Kyocere Taslalfa) मॉडेल नं.१८० सिंगल ट्रे असलेले रु.५१ हजार किंमतीचे झेरॉक्स मशीन देणगी घेतलेले आहे. त्याचा प्रती मिनिट १८ कॉपीज् स्पीड असुन ते आज अखेर व्यवस्थित चालु आहे. सदर मशीनला आजअखेर टोनर कार्ट्रेज शिवाय इतर कोणताही खर्च झालेला नाही.

संस्थानच्या प्रत्येक निवासस्थानासाठी प्रती मिनिट १८ कॉपीज् क्षेमतेचे, दोन ट्रे असलेले (लिगल व ए ४ पेपर करीता) ४ झेरॉक्स मशीन खरेदी करता येतील. त्यासाठी ३-४ डिलरकडुन कोटेशन मागविता येतील व आलेले कोटेशन मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे ऊघडुन न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देता येईल किंवा कोटेशन धारकांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे चर्चा-वाटाघाटीसाठी बोलविता येईल. (यासाठी एका मशीनची अंदाजे किंमत रु.६५ हजार x ४ मशीन =२,६०,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे. )

**निर्णय क्र.९८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई भक्तांच्या व कार्यालयीन कामाच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्तनिवासस्थान विभागाकरीता ०४ नविन झेरॉक्स मशिन घेण्याऐवजी सदर ठिकाणी अद्ययावत स्कॅनर मशिन बसविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-१२ )

---

**विषय नं.५३** **श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे यांचे मानधन रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४मधील तरतुदः- क्र.१७ (१ ) व १७ (२) (ढ ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२००९ चे सभेतील निर्णय

**प्रास्तविक :-** (१) श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे यांची जा.नं. एसएसएस वशी ०१/१५७१८/२००७ दि.०३/१०/२००७ शैक्षणिक संकूलाकडे ग्रंथालय सहाय्यक या पदावर रु. ३०००/- एकत्रित मानधनावर करण्यात आली होती. तद्नंतर त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२००९ चे सभेतील निर्णयानुसार जा.नं. एसएसएस वशी ०१/३६८८/२००९ दि.१६/१०/२००९ चे आदेशान्वये एक वर्ष मुदतवाढ देऊन रु.३०००/- वरुन रु.४०००/- मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.

(२) मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०९/२००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं. एसएसएस वशी ०१/३६८८/२००९ दि.१६/१०/२००९ अन्वये श्रीमती बढे यांना दि.०३/१०/२००९ पासून जाहीरातीव्दारे ग्रंथपाल या पदावर नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

(३) जा.नं.एसएसएस/कनिष्ठ/५४७९/२०१२ दिनांक ०१/०२/२०१२ चे आदेशान्वये श्री. भाऊसाहेब बाबुराव शिंदे यांची ग्रंथपाल या पदावर कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूक करण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(४) मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे तोंडी आदेशानुसार श्रीमती बढे यांची मानधनावरील तात्पुरती नेमणूक पुढे सुरु ठेवण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालयातील एक मदतनीस श्री संतोष शामराव परसपाटकी यांची पदोन्नतीने लिपीक पदावर लेखाशाखेकडे बदली करण्यात आली. या रिक्त पदाचे मदतनीसाचे काम श्रीमती बढे यांना देण्यात आले व त्यांनी दि. १.०२.२०१२ ते ८.४.२०१३ अखेर काम केले.

श्रीमती बढे यांना दि. १.२.२०१२ ते ३१.१०.२०१२ अखेरचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

**मागणी :-** श्रीमती बढे यांना दि. १.११.२०१२ ते ८.४.२०१३ चे एकुण मानधन रुपये २१,०००/- (अक्षरी रुपये एकविस हजार ) मात्र श्रीमती बढे यांना आदा करावयाचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :-** आर्थिक खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** वरील प्रमाणे मानधन रक्कम देय आहे.

तरी श्रीमती बढे यांना दि.०१.११.२०१२ ते ०८.४.२०१३ चे एकूण मानधन रुपये २१,०००/- (अक्षरी रुपये एकविस हजार ) मात्र आदा करणेचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.९८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे, यांचे दि. ०१.११.२०१२ ते ०८.४.२०१३ या कालावधीतील मानधन रुपये २१,०००/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री.किशोर रामराव मोरे (माजी कार्यकारी अधिकारी) यांचे दि.०१ ऑागष्ट २०१३ ते दि.२६ सप्टेंबर १३ या कालावधीतील वेतन अदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** माजी कार्यकारी अधिकारी श्री किशोर रामराव मोरे यांची संस्थान कडील प्रतिनियुक्तीची मुदत ३१/०७/२०१३ अखेर संपुष्टात आलेने त्यांना माहे जुलै २०१३ अखेर वेतन अदा करण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयानुसार श्री किशोर मोरे यांना दिनांक ३१/०७/२०१३ म.न. कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

आता महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडील क्रं.सासंवि-२०१३/६/प्र.क.३/२०१३/ का.सोळा मुंबई दि. ०६/१२/२०१३ चे पत्रान्वये श्रीयुत किशोर मोरे तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांना त्यांचा प्रतीनियुक्तीचा कालावधी दिनांक ३१/०७/२०१३ रोजी (म.नं.) समाप्त झालेने संदर्भिय क्र.०१ चे शासन निर्णयान्वये त्यांना कार्यमुक्त करुन त्यांच्या सेवा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात आल्या आहेत. सबब श्री किशोर मोरे तक्तालीन कार्यकारी अधिकारी यांच्या संदर्भात दिनांक ०१/०८/२०१३ ते २६/०९/२०१३ (म.नं.) हा कालावधी सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी गृहीत धरुन सदरचे कालावधीचे वेतन संस्थानकडून अदा करण्यात यावे, असे कळविलेले आहे.

तरी सदर शासनाचे पत्रानुसार श्री किशोर मोरे यांना दिनांक ०१/०८/२०१३ ते २६/०९/२०१३ या कालावधीतील वेतन अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईभक्तांचे अभिप्राय नोंदविणेसाठी ई-लोकशाहीच्या धर्तीवर सेवा सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद : १७** (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

**प्रास्ताविक :** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांना ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास, देणगी व लाईव्ह दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेल्या आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २१/०६/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५२९ नुसार श्री साईबाबा संस्थानकडून विविध भक्तोपयोगी सुविधा पुरविण्यात येतात, त्या सुविधा भक्तांना कशाप्रकारे उपयोगी ठरत आहेत किंवा त्यामध्ये कोणत्या प्रकारच्या उणीवा आहे, तसेच संस्थान कर्मचारी भक्तांना कशा प्रकारे वागणूक देतात इ. बाबत ई-मेल, एसएमएस अथवा इतर आधुनिक सुविधेव्दारे भक्तांच्या प्रतिक्रिया नोंदवून घेण्यात याव्यात असे निर्देशीत आहे. त्यानुसार विविध सर्व्हिसेस्चा अभ्यास करुन श्री साईभक्तांना पुरविणेत आलेल्या विविध सुविधांचा अभिप्राय घेणेसाठीची कार्यप्रणाली तयार करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी दिनांक १२/११/२०१३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे जाऊन ई-लोकशाही संगणक प्रणालीची माहिती घेतलेली आहे. औरंगाबाद येथील ई-लोकशाहीच्या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



धर्तीवर शिरडी येथील श्री साईभक्तांचे अभिप्राय घेणेसाठी संगणक प्रणाली तयार करणेसाठी दिनांक ३०/११/२०१३ रोजी Bay Talkitec, Chennai यांचे प्रतिनिधी श्री संजय बेलकडे यांना आमंत्रित करण्यात आलेले होते. सुरवातीस श्री साईभक्तांचे अभिप्राय घेणेकामी खालील विभागांचा समावेश करण्यात येणार आहे.

१) निवासस्थाने विभाग २) संरक्षण विभाग ३) जनसंपर्क विभाग
४) मंदिर विभाग ५) प्रकाशने विभाग

वरीलप्रमाणे श्री साईभक्तांचे अभिप्राय नोंदविणेसाठी सदरची सुविधा सुरु करणेकामी Bay Talkitec, Chennai या कंपनीकडे संपर्क साधला असता त्यांचेकडून दिनांक ०९/१२/२०१३ रोजी ई-मेलव्दारे कोटेशन प्राप्त झालेले असून त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Particular | Price |
|---|---|---|
| 01 | Server Setup & 30 port Card | Rs. 11,56,815/- + Tax |
| 02 | Hand Set (4 -No) | Rs. 4,20,000/- + Tax |
| 03 | Support Charges | Rs.6,20,000/- + Tax (Per Annum) |
| 04 | Changes In system (Flow/ Customization/ deletion / addition | Rs. 15,000 + Tax (Per day) |
| 05 | Annul maintenance Charges | 15 % of Purchase Value |
| 06 | Toll Free Number From BSNL | Rs. 50,000/- + Tax (One Time) Monthly Charges Extra |

वरीलप्रमाणे Setup करणेकामी व Server व Hand Set घेणेसाठी रक्कम रुपये १५,७६,८१५/- + Tax इतका खर्च अपेक्षित आहे. व इतर सर्व खर्च वर नमूद केलेप्रमाणे मासिक अथवा वार्षिक देय राहील. श्री साईभक्तांचे अभिप्राय नोंदविणेकामी सेवा सुरु करणेसाठीचे माहितीचा मसुदा जनसंपर्क कार्यालयाकडून तयार करुन घेतला जाईल, तसेच Toll Free Number घेणेकामीची कार्यवाही व त्याचे येणारी मासिक बीले नेहमीप्रमाणे विद्युत विभागामार्फत अदा करता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :** उपरोक्त विवेचनानुसार, श्री साईभक्तांना अभिप्राय नोंदविणेसाठी ई-लोकशाहीच्या धर्तीवर सेवा सुरु करणेबाबत यथायोग्य निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांना अभिप्राय नोंदविणेसाठी ई-लोकशाहीच्या धर्तीवर सेवा सुरु करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.९८८ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** साईआश्रम भक्तनिवास इमारतीमधील १५३६ खोल्या देणगी स्वरुपात संस्थानला मिळालेल्या आहेत. या देणगीदाखल खोल्या स्वीकारताना झालेल्या करारनाम्यामध्ये, संस्थानने गरीब व गरजु साईभक्तांकरिता सवलतीच्या अत्यल्प दरात सर्व सोयी-सुविधांयुक्त निवासव्यवस्था पुरविणेबाबत नमुद केलेले आहे.

साईआश्रम भक्तनिवास दि.११.०४.२०१३ रोजी सुरु करणेत आलेले असून सदर निवासस्थान हे समाधी मंदिरापासून एक ते दिड किलोमीटर अंतरावर असल्यामुळे साईभक्तांना साईआश्रम भक्तनिवासपासून समाधी मंदिराकडे आरती/ दर्शन/ प्रसादभोजन इ.साठी जाणे-येणेकरिता मोठया बसेस (५४ आसनी) उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, तरीही ती व्यवस्था अपुरी पडत आहे व बस भरेपर्यंत भक्तांना प्रतिक्षा करावी लागते. त्यामुळे साईभक्तांना रिक्षाचा वापर करावा लागतो व रिक्षावाले जास्त भक्तांकडून जास्त भाडे आकारतात, याची साईभक्त तक्रार करतात. यासाठी १० मिनी बसेस घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन वाहतुकीची व्यवस्था कायम राहील व भक्तांना बसची प्रतिक्षा करावी लागणार नाही. तसेच वृध्द व दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्या अंध/ अपंग भक्तांकरिता कमीत-कमी १० बॅटरी कारची व्यवस्था देखील करणे आवश्यक आहे.

उपरोक्त सुविधा कमी पडत असल्यामुळे सध्या साईआश्रम भक्तनिवासमध्ये खोल्या घेणाऱ्या भक्तांची संख्या कमी आहे व आजमितीस जास्तीत-जास्त ४०% खोल्यांचा वापर भक्त करतात व उर्वरित खोल्या रिकाम्या राहतात. परंतु सर्व खोल्यांचा मेंटनन्स खर्च पुर्णपणे द्यावा लागतो, त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान होते.

वरील कारणांमुळे समिती असे सुचवित आहे की, साईआश्रम भक्तनिवास येथील निवासव्यवस्थेचा जास्तीत- जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा व संस्थानचे आर्थिक नुकसान टाळावे या हेतूने खोल्यांचे दर कमी करणे आवश्यक आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यामुळे दि.०१ जानेवारी २०१४ पासून साईआश्रम भक्तनिवासमधील प्रती ए.सी. खोलीसाठी (०३ व्यक्तींसाठी) रु.९००/- याऐवजी रु.५००/- व प्रती नॉन ए.सी. खोलीसाठी (०३ व्यक्तींसाठी) रु.५००/- याऐवजी रु.२००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र याप्रमाणे सेवाआकार आकारणेत यावा. जेणेकरुन जास्तीत-जास्त साईभक्त या खोल्यांचा लाभ घेतील व गोर-गरीब भक्तांची निवासाची सोय होईल.

सदरहू निर्णय प्रायोगिक तत्वावर असून साईआश्रम भक्तनिवासमध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांना सर्व सोयी-सुविधा मिळाल्यानंतर समिती याचा फेरविचार करु शकेल.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी/ वाहन विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ९३३ ते ९८८ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (अजय मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी